विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष पहिले ▌ अंक आठवा ▌ मे २०२३




## महाराष्ट्र दिन
## कामगार दिन

## महा. अंनिसचे विविध उपक्रम...


कोराडी (नागपूर) व्यसनांच्या दुष्परिणामावर प्रदर्शन


कोल्हापूर अंनिस टीमच्या वतीने महिलेचे जटानिर्मूलन


गडहिंग्लज शाखेतर्फे यात्रेत पशुबळी विरोधातील कायद्याची कडक अंमलबजावणी करणेबाबत निवेदन देण्यात आले.


चमत्कार सादरीकरण कार्यक्रम करताना प्रा. दिगंबर कट्यारे

## देहदान व अवयवदान अभियान


कुर्ला (मुंबई)


नंदुरबार


पिंपरी (पुणे)


हिंगणा (नागपूर)

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे
मुखपत्र




# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**वर्ष पहिले । अंक आठवा**

**मे २०२३**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** ४
- **कामगार दिन विशेष** : कामगार श्रमिकांची परिस्थिती आणि प्रतिगामी सामाजिक विचार /कॉ. अतुल दिघे ५
- **महाराष्ट्र दिन विशेष** : महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत सत्यशोधक समाजाचे योगदान /प्रा. डॉ. तानाजी देशमुख ८
- **संशोधन** : भगवान गौतम बुद्धांची स्त्रीविषयक भूमिका : आक्षेप आणि वस्तुस्थिती/ प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड ११
- **चिकित्सा** : संत चोखामेळा यांच्या चरित्रातील दंतकथांचा अन्वयार्थ/डॉ. दत्ता सरगर १६
- **इतिहास** : प्राच्यविद्यापंडित शरद पाटील कृत छत्रपती संभाजीराजांच्या कार्याचे अन्वेषण/डॉ. श्रीमंत कोकाटे १९
- **व्यसनमुक्ती** : तंबाखू सेवन : एक जीवघेणे व्यसन/ डॉ. विवेक निकम । डॉ. अतुल निकम २२
- **संवाद** : कार्याध्यक्ष संवाद/माधव बावगे २४
- **व्यक्तिविशेष** : परिवर्तनाचा वाटाड्या – के. डी. खुर्द / कृष्णात स्वाती २५
- **पुस्तक परिचय** : द लास्ट गर्ल : आयसिसच्या बंदिवासातून सुटलेल्या तरुणीची संघर्षकथा / यशवंती शिंदे २९
- **संघटना** : संघटना बांधणी/विनायक सावळे ३२
- **विचारयात्रा** : तर्कशील सोसायटीच्या कार्यकर्त्यांची महाराष्ट्र यात्रा/ प्रा. डॉ. सुदेश घोडेरा ३४
- **महाराष्ट्र अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३६
- **वाचकांच्या प्रतिक्रिया**


‘अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका’ हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर–४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhashradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे–पवार
  किशोर बेडकिहाळ
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले

- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

**वार्षिक वर्गणी**

**४००** रू. (व्यक्तीसाठी) **५००** रू. (संस्थेसाठी)

**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**

संपर्क : अजय भालकर–९३५९०८०८२०

विवेक जागर संस्था,
ICICI बँक, धुळे
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463

Scan & Pay

## विचारवंत व समाज

मनुष्य म्हणजे विचारशील प्राणी आहे. फ्रेंच तत्त्वज्ञ रेने देकार्त याने विचार करण्याची शक्ती हीच मनुष्याच्या अस्तित्वाची खूण मानली. ज्या अर्थी मी शंका घेतो, विचार करतो त्या अर्थी शंका घेणारा, विचार करणारा असा मी अस्तित्वात आहे; असा सिद्धांत त्याने मांडला. "I think, therefore I am' हे देकार्तचे सूत्र तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा निष्कर्ष मानले जाते. जगात झालेल्या परिवर्तनांची प्रेरणा मनुष्याच्या विचारशक्तीमध्ये आहे. मानवी विचारक्षमतेमधून अनेक शास्त्रांचा, ज्ञानशाखांचा, विचारप्रवाहांचा, कलांचा जन्म व विकास झाला आणि होत आहे.

बौद्धिक किंवा वैचारिक क्षेत्रामध्ये उच्च दर्जाची तत्त्वचिंतनात्मक मांडणी करणाऱ्या बुद्धिवादी व्यक्तीस विचारवंत म्हणतात, ''जे आपण तपासून पाहिलेले नाही असे जीवन जगण्यात अर्थ नाही'', या सॉक्रेटिसच्या विधानामधून विचारवंतांच्या विश्वातील चिकित्सेचे महत्त्व समजते. चिकित्सेतून प्रस्थापित जीवनव्यवहाराचे मूल्यमापन होत असते. व प्रचलित रूढीतत्त्वांना एक आव्हान मिळण्याची शक्यता असते. समाजाच्या बौद्धिक दर्जाचा गुणात्मक विकास करणे हे विचारवंतांचे प्रमुख कार्य असते. हे एक बौद्धिक सत्यान्वेषण असते. सत्य काय आणि असत्य काय याचे वस्तुनिष्ठ आकलन मांडणारे न्यायपीठ म्हणून काम करणे ही विचारवंतांची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रकारचे दबाव, प्रलोभने, मोह, पूर्वग्रह, लाभ वगैरेंचा स्पर्शही होऊ न देता आपली सामाजिक जबाबदारी पार पाडणे, हे विचारवंतांचे कर्तव्य आहे.

विचारवंतांचे समाजातील स्थान हे दीपस्तंभाप्रमाणे आहे. विचारवंत म्हणजे समाजाचे डोळे. त्याने समाजाला नवी दृष्टी द्यायची असते. अविकसित समाजात जडता, रूढीप्रियता, भेदभाव, शोषण वगैरेंमुळे प्रगतीचा मार्ग खुंटलेला असतो. प्रगतीच्या मार्गावरील हे अडथळे दूर करून समाजाला विचारशील, विकसनशील बनविणे व त्यास आधुनिकीकरणाच्या वाटा दाखविणे हे महत्त्वपूर्ण काम विचारवंतास करावे लागते. सामाजिक घडामोडी व प्रवृत्ती यांचा अभ्यास करून आपली मते परखडपणे मांडणे व समाजाचे आणि आणि सत्ताधाऱ्यांचे मार्गदर्शन करणे ही विचारवंतांची सामाजिक जबाबदारी असते. विचारवंत हा सत्ताधाऱ्यांवर एक बौद्धिक अंकुश ठेवत असतो. समाजप्रबोधनाचे हे कार्य वाटते तितके सोपे नाही. नवविचारांच्या प्रणेत्यांना प्रस्थापित हितसंबंधांचा कडवा विरोध वारंवार सहन करावा लागतो; त्या वेळी विचारवंताची खरी कसोटी लागते.

प्रस्थापित सामाजिक व्यवस्था स्थितिशील असते. प्रस्थापित सामाजिक संस्थांच्या व्यवहाराचे संरक्षण करण्याकडे लोकमानसाची नैसर्गिक प्रवृत्ती असते. समाजामध्ये विविध मतप्रणाली, भिन्न भिन्न प्रवाह, परस्परविरोधी हितसंबंधांचे गट असतात. अशा वेळी आपल्याला जाणवलेले सत्य प्रस्थापित व्यवस्थेच्या कितीही विरोधी जाणारे आणि म्हणून कितीही अप्रिय ठरणारे असले तरी निर्भयपणे मांडणे हे विचारवंतांचे काम आहे. स्थितिशील समाजगट व त्यांना धक्का देणारी नवीन मूल्ये ह्यांच्यात निकराचे बौद्धिक संघर्ष होत राहणे हे समाजाच्या वैचारिक जिवंतपणाचे, विकसनाचे लक्षण आहे.

जीवनव्यवहाराविषयी, जगण्याच्या गुणवत्तेविषयी ज्या समाजामध्ये एक सत्त्वभान जागृत असते, ज्या समाजात काही एक प्रबोधनाची, चिकित्सा-विश्लेषणाची परंपरा जागृत असते, त्या समाजात विचारवंत उदयाला येण्याची शक्यता अधिक असते. या पार्श्वभूमीवर समकालीन सामाजिक स्थिती व आपल्या समाजातील विचारवंतांचे स्थान यांचा अंतर्मुख होऊन आपण प्रत्येकाने विचार करावा. या मंथनातूनच नवप्रबोधनाची पहाट उगवेल.

**– प्रा. डॉ. अरुण शिंदे**
अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# कामगार श्रमिकांची परिस्थिती आणि प्रतिगामी सामाजिक विचार

**कॉ. अतुल दिघे**
९८२२४३१९९६

१ मे जागतिक कामगार दिन. यानिमित्ताने वर्तमान भांडवलशाही, कंत्राटीकरण, कामगार कायदे मोडीत काढण्याचे धोरण, राज्यकर्त्यांची कार्पोरेटधार्जिणी भूमिका, प्रतिगामी शक्तीची वाढ व या साऱ्यांचे दुष्परिणाम यांचे परखड विश्लेषण करणारा लेख.

देशातील कामगार व श्रमिक यांची परिस्थिती अतिशय बिकट आहे. ती दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत आहे. दुसऱ्या बाजूला समाजात प्रतिगामी विचार वाढताना दिसत आहेत.

१९९० सालामध्ये आपल्या देशाने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यानंतर या देशात आलेल्या सर्वच सरकारांनी समाजाला मुक्त अर्थव्यवस्थेच्या दिशेने नेण्याचे काम कमी-अधिक ताकदीने केले तेव्हा काही घटक मुक्त अर्थव्यवस्थेचा संघटित विरोध करत होते. त्यामध्ये संघटित कामगारवर्ग ही एक शक्ती होती.

संघटित कामगार वर्गाने लढून मिळवलेले हक्क विविध कायद्यांत समाविष्ट झालेले होते. नवीन आर्थिक धोरणात हे हक्क नष्ट करणे हे धोरण दडलेले होते. तसेच कामावर ठेवण्याचा व कामावरून काढण्याचा हक्क (राईट टू हायर अँड फायर) मालकांना देणे हाही भाग होता. आज संघटित कामगार वर्गाला पूर्ण नेस्तनाबूत करण्यात आले आहे. त्यांची जागा असंघटित व सहज अन्याय करता येईल अशा कंत्राटी, दैनिक वेतनी, मानधनी अशा कामगारांनी घेतली आहे. अशा नोकरीची शाश्वती नसलेल्या कामगारांची संख्याच आता ठिकठिकाणी जास्त झाली असल्यामुळे कामगार वर्गाची ताकद आता आणखीच कमी झाली आहे. तरीही कामगार संघटना नवीन आर्थिक धोरण व त्याचे दुष्परिणाम यांच्याशी लढत आहेत.

कामगार कायद्यात सामाजिक सुरक्षेचे कायदे हेही महत्त्वाचे होते. ज्या कामगाराला नोकरीची शाश्वती नाही तो सामाजिक सुरक्षेचे कायदे कसे उपभोगणार? त्यामुळे बाळंतपणाच्या रजेचा कायदा, कामगार राज्य विमा योजना ही कुटुंबाला औषधोपचारासाठी संरक्षण देणारी योजना, भविष्य निर्वाह निधी व पेन्शन योजना, कुटुंबाच्या किमान गरजा भागवण्यासाठी किमान वेतन कायदा अशा कायद्यांचा लाभदेखील हा कामगार घेऊ शकत नाही, हे आज वास्तव बनले आहे. या कामगारांना हे लाभ मिळावेत यासाठी कामगार संघटना प्रयत्नशील आहेत. पण आज विलक्षण गतीने शासकीय हस्तक्षेपाच्या माध्यमातून कामगार वर्गाचे कंत्राटी, दैनिक वेतन व मानधन या व्यवस्थेत रूपांतर केले जात आहे. त्यासमोर कामगार संघटनांनी चालवलेला प्रयत्न खूपच तोकडा पडत आहे, असे स्पष्ट चित्र दिसत आहे.

कामगार आयुक्त (कामगार कायदे, अंमलबजावणीची यंत्रणा) सुरक्षा व आरोग्य (प्रदूषण, अपघात इत्यादीबाबत काम करणारी यंत्रणा) भविष्य निर्वाह निधी व पेन्शन, कामगार राज्य विमा योजना (औषधोपचाराची योजना) या सर्वात नेमणुका न करून या सर्व यंत्रणा दुबळ्या करण्यात आल्या आहेत. 'इन्स्पेक्टर राज नको' अशी मोदी सरकारने केलेली घोषणा ही याबाबत परिस्थिती अधिक खराब करणारी घटना ठरली आहे. इन्स्पेक्टरचे तपासणीचे अधिकार रद्द झाले आहेत. आता कायदे मोडणाऱ्यांचे पूर्ण फावले आहे.

नवीन आर्थिक धोरणाची भांडवलदार, राजकीय पक्ष, माध्यमे यांनी केलेली भलावण व याला भुललेले समाजमन याचा न्यायालयांवर परिणाम झाल्याशिवाय राहील का? कायम कामे कंत्राटी पद्धतीने देण्यात काही चुकीचे नाही असे न्यायालयांनी सांगायला सुरुवात करताच सारे बंध गळून पडले व कंत्राटीकरणाचा बांध फुटला.

**बाजार व्यवस्था वाढली, श्रमिक हतबल झाला**

परंतु या नवीन आर्थिक धोरणाला इतरही पैलू होते. नवीन आर्थिक धोरणाने मानवी गरजांचे बाजारीकरण केले. या बाजारीकरणाला विकासाचे इंजिन बनवले. त्यामुळे समाजात कामगार, कष्टकरी मध्यमवर्ग भरडला जाऊ लागला आहे. साध्या गरजा जसे पाणी, वीज, इंधन, रस्ते, दिवाबत्ती, प्रवासाची साधने, शिक्षण, घरे, आरोग्य, म्हातारपणीचा आधार असणारी पेन्शन याचे बाजारीकरण केले गेले आहे. खेळ, वृत्तपत्रे, मीडिया, संगीत, चित्रकला, धर्म इत्यादी मानवी समाजाच्या वरच्या दर्जाच्या मानल्या गेलेल्या व समाधान देणाऱ्या बाबींचेही वाढते बाजारीकरण दिसत आहे.

अधिक पैसा फेकून उत्तम सुविधा मिळवता येते. कमी पैशात निकृष्ट वस्तू व सेवा मिळते. हा बाजाराचा गुण येथे लागू आहे. त्यामुळे सरासरीपेक्षा अधिक उत्पन्न मिळवणारे या बाजारव्यवस्थेचे समर्थक आहेत, तर सरासरीपेक्षा कमी उत्पन्न मिळवणारे बाजारव्यवस्थेचे बळी आहेत, असे चित्र दिसत आहे. कामगार व विशेषत: असंघटित कामगार, सामान्य श्रमिक व मध्यम वर्ग हा या बाजारव्यवस्थेचा बळी बनला आहे. पण तो त्याबद्दलची स्पष्टता नसल्यामुळे व असंघटितपणामुळे हतबल आहे, तो या परिस्थितीत मुकाट्याने रोज बळी जात आहे.

**प्रतिगामी शक्तींची वाढ, समाजाचा तोल बदलला**

या सर्व प्रक्रियेत आणखी एक प्रचंड संख्या असणारा असा सामाजिक वर्ग तयार झाला. यामध्ये कंत्राटदार व लठ्ठ पगाराचे अधिकारी असा हा वर्ग आहे. यांचे सर्वाधिक महत्त्वाचे काम कामगारांकडून काम करून घेणे हे आहे. यासाठी कायद्याचे कोणतेही संरक्षण नसलेला कामगार हे एक सहज भक्ष्य आहे. त्यामुळे ही सर्व यंत्रणा कामगारांवर अमानुष अत्याचार करताना दिसत आहे. त्यांनी माणुसकीच नष्ट केली आहे.

या सर्व प्रक्रियेतून आणखी एक सामाजिक शक्ती बलदंड झाली आहे. ही कार्पोरेट भांडवलशाही आहे. मूठभर व्यक्ती बंद खोलीत बसून (कधी कधी गोल्फ खेळता खेळतासुद्धा) करोडो लोकांच्या जीवनावर परिणाम करणारे निर्णय करतात. पण ज्यांच्या जीवनात हा परिणाम होतो त्यांना त्याची कल्पनाही नसते. त्या निर्णयप्रक्रियेवर त्यांचे कोणतेही नियंत्रणही नसते. सरकारने विकासासाठी अनेक उद्योग उभारले. सामान्यांनी स्वत:च्या हितासाठी सहकार निर्माण केला. सरकारी व सहकारी आता खासगी, कार्पोरेट होताना दिसत आहे. सरकारी व सहकारीपेक्षा आता खासगी कार्पोरेट आता अधिक बलदंड बनले आहे.

कार्पोरेट व्यवस्था ही मानवी मूल्ये, आधुनिक विचार, समता, आत्मसन्मान, निसर्गाचे संरक्षण व संवर्धन इत्यादी बाबींवर जाहिराती देणे व अशी कामे करणाऱ्या संस्थांना काही मदत करणे असे करताना दिसतात. ते जरी मानवी चेहरा दाखवीत असले, तरी स्वत:चे व्यावसायिक निर्णय करताना नफा किंवा तोटा याच बाबींचा प्रधान विचार करतात असे अनुभवास आले आहे. तसेच याकामी संपूर्ण सत्तेची यंत्रणा कामाला जुंपली जाते असे अनुभवाला येते. टाटा आणि एस. आर. या कंपन्यांना छत्तीसगडमधील हत्तींचा अधिवास असणारी व असंख्य आदिवासी पाडे असणारी जमीन खाणकामासाठी दिली गेली. यासाठी भाजपा, काँग्रेस हे एकमेकांचे शत्रू असणारे पक्ष, राज्य शासन, जिल्हा प्रशासन, पोलीस दल, राखीव दले व सैन्यसुद्धा जुंपले गेले. अशा टोकाच्या क्रियेला जेव्हा प्रतिक्रिया येते तेव्हा तिला मीडिया नक्सलवादी ठरवण्यात पुढाकार घेतो. कारण मीडियाही आता विक्रेय वस्तू आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या बलदंड शक्ती त्याचा उपभोग घेतात हे आपण जाणतोच.

**सरंजामी विचाराने भारतीय भांडवलशाही रचली**

परंतु भारतीय समाज व्यवस्थेतील काही बाबींवर या आर्थिक धोरणाचे व श्रमिकांना शक्तीहीन केल्याचे अधिक गंभीर परिणाम दिसत आहेत. कारण येथील समाजाची नवीन रचना होताना जुन्या सरंजामी विचारांनी त्यात सहभाग घेतला आहे, असे चित्र दिसते. गेल्या ३५ वर्षांच्या कामगार क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे असे सांगता येईल की, सर्व कमी मोबदल्याची, कष्टाची, प्रतिकूल परिस्थितीत करायची कामे करण्यामध्ये या देशातील पूर्वाश्रमीचे शूद्र आहेत, तर कंत्राटदार हे मुख्यत: स्वत:ला कुलीन समजणारे पूर्वाश्रमीचे शूद्र (जसे मराठे) किंवा वैश्य व ब्राह्मण आहेत. यामध्येही कामगार कंत्राटे घेणारी शूद्र तर अन्य कंत्राटे घेणारे वैश्य व ब्राह्मण आहेत. भांडवलदार, विशेषत: कार्पोरेट भांडवलदार हे बनिया ब्राह्मण व क्वचित अश्रफी मुस्लीम किंवा पारशी आहेत.

कच्छ, गुजरात, राजस्थान, मारवाड, सिंध, पंजाब या भारतीय भूभागाला सर्वात जुनी व्यापारी परंपरा आहे. देशभरातील सर्व व्यापार हा या प्रांतातून येणाऱ्या व्यक्ती व जमातीच्या ताब्यात आहे. हे जितके आर्थिक आहे तितकेच सांस्कृतिकसुद्धा आहे.

अशा प्रकारे हा कार्पोरेट व दलाल व्यापारी भांडवलदार जुन्या समाजरचनेतील उच्चवर्णीय आहे. जुन्या समाजरचनेची मूल्यव्यवस्था त्यांच्याच जुन्या पिढ्यांनी राबवली आहे व ती समाजव्यवस्थेची मूल्ये चुकीची आहेत, ती संस्कृती विषमतेची आहे असे त्याला वाटतच नाही. काही व्यक्ती जुन्या विचारातून बाहेर पडत आहेत; पण जनविभाग जुन्याच विचाराला चिकटून आहेत. बदल फार संथपणे घडत आहे.

अशा स्थितीत जुनी सांस्कृतिक मूल्ये समाजात रुजवण्यात कार्पोरेटचे वर्चस्व, त्यांचे अनुकरण करणारे कंत्राटदार व उच्चपदस्थ अधिकारी व त्यांचे अनुकरण करणारे कामगार श्रमिक असे सांस्कृतिक धबधबे या उतरंडीवरून समाजात वाहाताना दिसत आहेत. कार्पोरेट मुख्यत: ब्राह्मण बनिया असल्यामुळे जुन्या संस्कृतीचे व त्यावर आधारित विषमतेचे उदात्तीकरण करण्याचा विचार समाजात आहे. विषमताजनक अशी प्रतीके (राम, सीता, शूर्पणखा, लक्ष्मण, मारुती, गरूड, शबरी) पुढे आणली जात आहेत. यात आपण काही गैर करतो असे सत्ताधारी पुरुषी वर्चस्व मानणाऱ्या उच्चवर्णीय भांडवलदार वर्गाला वाटत नाही.

**धोका अधिक मोठा**

कामगार श्रमिक यांच्या दरिद्रीकरणाची जी प्रक्रिया समाजात कार्पोरेट दलाल यांनी राबवली आहे, त्यातून अधिक गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. समाजाला बेकारी, महागाई, दारिद्र्य, दैन्य, विषमता व हीन जीवनाचे दु:ख जाणवले, तर असंतोष निर्माण होईल. हा असंतोष स्फोटक परिस्थिती निर्माण करतो आहे. त्यामुळे समाजमन बधीर करणे आवश्यक आहे असे सत्ताधारी वर्गाला जाणवत आहे. यासाठी समाजमन वेडावणारा विचार समाजात पसरवला जात आहे. हा विचार एका बाजूला राष्ट्रीय अस्मितेला आवाहन करतो, तर दुसरीकडे बहुसंख्यांकविरुद्ध अल्पसंख्यांक अशी कृत्रिम फूट समाजात निर्माण करतो. ही फूट कधी धर्म, कधी जात, कधी प्रांत अशा जन्माधारित वैशिष्ट्यांवर आधारलेली असते. खरा शत्रू श्रमिकांची अमानुष पिळवणूक करणारी व्यवस्था आहे, याकडे लक्ष जावू नये म्हणून आटापिटा केला जात आहे.

यामुळे दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश अशा विचारवंतांचे खून केले जात आहेत, विचारवंतांना खटल्यांमध्ये गुंतवून तुरुंगात डांबले जात आहे, विचार व्यक्त करणाऱ्यांना दहशत केली जात आहे. त्यांना ट्रोल करणे, त्यांच्यावर समाजमाध्यमातून राळ उडवणे असेही केले जात आहे.

समाजातला प्रतिगामी विचार संघटना म्हणून तसेच राजकीय पक्ष म्हणून संघटित आहे. त्याला त्याचे काम पार पाडण्यास आवश्यक साधने व पैसा पुरवला जात आहे.

आता या प्रक्रियेचा तळ गाठला जात आहे. प्रक्रिया अशाच पद्धतीने पुढे जाऊ शकत नाही. हा बदल व्हावा म्हणून दोन्ही बाजूने प्रयत्न होणार आहे.

ज्यांनी ही प्रक्रिया सुरू केली त्यांना अवसर मिळायचा असेल, तर आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या नागावलेल्या समाजाला आता राजकीय हक्कांच्या दृष्टीने नागवणे याखेरीज मार्ग राहील असे दिसत नाही. त्यामुळे लोकशाही व घटना धोक्यात आहे. दुसरीकडे अनेक घटक, कामगार, श्रमिक, कष्टकरी शेतकरी, मध्यमवर्गीय हे समाजविभाग गुंगी झुगारून जागे होताना दिसत आहेत, तर समाजहिताकरिता काम करणाऱ्या संस्था, संघटना, एन.जी.ओ, काही राजकीय संघटना व काही विचारवंत समाजाची कोंडी फुटावी म्हणून प्रयत्न करत आहेत. हे प्रयत्न अधिक जुटीने करणे आवश्यक बनले आहे. यामध्ये आपले विभागीय अहंभाव विभागीय स्वार्थ व व्यक्तिवाद ही या जुटीची कमकुवत स्थाने आहेत. या कमकुवतपणावर मात करून व्यापक जुटीने आपण प्रयत्न केले पाहिजेत, तरच स्वातंत्र्य चळवळ, समतेची चळवळ व कामगार चळवळ यांनी समाजाला दिलेली शिदोरी आपण पुढे नेऊ शकू.

२०२३ च्या १ मे कामगार दिनी याबाबत आम्ही वचनबद्ध होणे आवश्यक आहे.

**(लेखक ज्येष्ठ कामगार नेते आहेत.)**

●



# महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत सत्यशोधक समाजाचे योगदान

**प्रा. डॉ.तानाजी देशमुख**
९६०४१४२४५५

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेस यावर्षी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्र दिनानिमित्त (१ मे) सत्यशोधक चळवळीचा महाराष्ट्राच्या वैचारिक व सामाजिक जडणघडणीतील योगदानाची मीमांसा करणारा विशेष लेख.

महात्मा फुले यांचे जीवन व कार्य समाज क्रांतिकारक आहे. कालबाह्य झालेल्या जुनाट मूल्यांवर त्यांनी सतत कठोर प्रहार केला. सामाजिक समता, मानवता व विवेकवाद यांचा पुरस्कार केला. माणसांची मूलभूत प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी म. फुले यांनी आमरण लढा दिला. माणसाला मनुष्यत्वाची ओळख करून दिली. सामाजिक व धार्मिक स्तरावर नव्या, प्रगत, समतामूलक समाजरचनेसाठी ते झगडत राहिले. अनिष्ट धर्मव्यवस्था उखडून टाकण्यासाठी त्यांचे सतत प्रयत्न सुरू राहिले. या त्यांच्या आयुष्यभराच्या कार्याचे दर्शन त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजामधून घडते.

बुद्धिप्रामाण्यवादी, शोषणमुक्त समतामूलक समाजपरिवर्तनाचे विचार आपले अनुयायी व शेतकरी, कामगार समूहांपर्यंत पोचविण्यासाठी संघटनेची गरज म. फुल्यांना भासू लागली. यातूनच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे केली. मानवी हक्क आणि अधिकारांची प्रतिष्ठापना, गुलामीतून मानवाची मुक्तता, शोषणमुक्त समाज, धर्म व धर्मग्रंथांची बुद्धिवादी दृष्टिकोनातून चिकित्सा, शूद्र अस्मितेचा अभिमान आणि राज्यकारणविरहित कार्य हे सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते.

सत्यशोधक चळवळ ही सामाजिक व धार्मिक परिवर्तनाची चळवळ होती. या चळवळीत मानवी प्रतिष्ठा, समता, व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य या मूल्यांची जपणूक केली जात होती. सत्यशोधक समाजाचे सभासद होताना आपण सर्व भावंडे आहोत, अशा बुद्धीने वागण्याची, धार्मिक विधीतील मध्यस्थांची मदत न घेण्याची, आपल्या मुली- मुलांना शिक्षण देण्याची शपथ घ्यावी लागे. सत्यशोधक समाजाचे सभासद होण्यास जात, धर्म व संप्रदाय यांचे बंधन नव्हते. कनिष्ठ वर्गातील लोकांना ब्राह्मणी धर्माच्या मानसिक, आर्थिक, धार्मिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट होते. दर आठवड्याला होणाऱ्या सभेत सत्य, सद्‌विचार, जातीव्यवस्था, दारूबंदी, मूर्तिपूजा, पुरोहितशाही, शिक्षण, शेती व शेतकरी इत्यादी विषयांवर विचारविनिमय होत असे.

सत्यशोधक चळवळीमुळे शेकडो वर्ष गुलामगिरीत राहिलेल्या माणसात आत्मभान आले व बहुजन समाज आत्मोन्नतीसाठी सजग होऊ लागला. धर्म व ग्रंथ प्रामाण्याऐवजी आधुनिक ज्ञान प्राप्त करून भौतिक प्रगती करण्याचा विचार सामान्य माणसाच्या मनामध्ये रुजू लागला. बहुजन समाजाला शेकडो वर्षांपासून शोषणारी पुरोहितशाही व भिक्षुकशाही यांची धार क्षीण झाली. धार्मिक विधीतील मध्यस्थ नाहीसा करण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक चळवळीपासून प्रेरणा घेऊन आधुनिक महाराष्ट्रात ग्रामीण, दलित, आदिवासी, शोषित, वंचित, उपेक्षित यांनी आत्मोन्नतीसाठी लढे सुरू केले. या वर्गातील तरुण सृजनशील प्रतिभावंतांनी सामाजिक जाणिवांचे साहित्य निर्माण करून वैचारिक प्रबोधन केले. दलित मुक्ती लढ्याची व अंधश्रद्धा निर्मूलन समितीची वैचारिक पायाभरणी सत्यशोधक समाजाच्या विचारधारेतून झाली. आधुनिक, प्रगतिशील, पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीचा वैचारिक व कृतिशील पाया सत्यशोधक चळवळीने घातला.

'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी निरनिराळ्या विषयांवर सखोल चिंतन केले आहे. सुख, धर्मपुस्तक, निर्माणकर्ता, पूजा, नामस्मरण नैवेद्य अथवा अन्नदान, अनुष्ठान, स्वर्ग, स्त्री, पुरुष, पाप,

पुण्य, जातीभेद, पशुपक्ष्यादी वगैरे आणि मानव, प्राणी यांच्यामध्ये भेद, धर्म, नीती, तर्क, दैव, आर्य, भटब्राह्मणांचे वेद आणि सार्वजनिक सत्तेची तुलना, सत्य, आकाशातील ग्रह, जन्म, कन्या अथवा पुत्र यांच्या नावाचा संस्कार, अन्नाचा संस्कार आणि शाळेचा संस्कार, लग्न, दुष्टाचरण, मृत्यू, प्रेताची गती, श्राद्ध आणि एकंदरीत सर्व स्त्री-पुरुषास ग्रंथकर्त्याची प्रार्थना असे त्यातील प्रमुख २८ विषय आले आहेत. धर्मकल्पना व तिची व्यवस्था स्वयंभू व अपरिवर्तनीय असतात. या सनातन धारणेला म. फुले यांनी दूर सारले. त्यांनी या ग्रंथात मानवी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वत्रयींचा पुरस्कार करून अखिल मानव जातीस गवसणी घालणाऱ्या व्यापक विश्वधर्माची बैठक असणाऱ्या सत्यधर्माचा विचार मांडला. हा ग्रंथ म्हणजे नवसमाजरचनेचा व मानवी हक्कांचा जाहीरनामाच आहे.

धर्माने समाजाला मानसिक गुलाम बनवून त्याचे अमर्याद शोषण केले आहे. धर्माची व धर्मग्रंथाची कठोर चिकित्सा करण्यास परवानगी नाही. धर्म, धर्माज्ञा व शास्त्रवचने ही अपरिवर्तनीय असतात. त्यांचे आचरण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. असे विचार लोकमानसावर घट्ट बिंबवले आहेत. त्याचा पापपुण्य, स्वर्गनरक वगैरेंशी संबंध जोडल्याने एक प्रकारच्या भीतीपोटी लोक धर्मपरायण होतात व अंतिमतः धर्मव्यवस्था बळकट होत जाते. या पार्श्वभूमीवर हिंदूधर्म व धर्मग्रंथातील मांडणीला तर्कशुद्ध आव्हान देण्याचा प्रयत्न सत्यशोधक चळवळीने केला. विविध धर्मग्रंथ, वेद, उपनिषदे, पुराणग्रंथ, महाकाव्य, स्मृतिग्रंथ, सांप्रदायिक ग्रंथ, स्वर्गनरक, पूर्वजन्म, पुनर्जन्म, वर्णजातीव्यवस्था, अस्पृश्यता, दैववाद इत्यादी विषयावर सांगोपांग बुद्धिनिष्ठ विचार व कार्यकारणभावात्मक प्रश्न उपस्थित करून धर्मव्यवस्थेला कोंडीत पकडले आहे. ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य नाकारून बुद्धिवादी दृष्टीने माणूसकेंद्रित नवा विचार मांडला.

हिंदुस्थानाच्या अधोगतीचे व पराभवाचे मूळ दैववादी मानसिकतेत आहे म्हणून म. फुले व सत्यशोधक समाजाने देव व भक्त यामधील मध्यस्थ नाकारला आहे. लोकांनी देवळे व देवस्थाने यावर भाबडा विश्वास न ठेवता तेथील व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण करावे. तेथे पावित्र्य व मांगल्यापेक्षा फसवणूक जास्त चालू असते. यामुळे या देवळाचे व देवस्थानाचे पारंपरिक स्वरूप नाकारले आहे.

भारतीय समाज अनिष्ट प्रथा-परंपरांचा बळी ठरलेला आहे. जुन्यास चिकटून बसण्याचा रोग या समाजाला झाला आहे. 'जुने ते सोने' या मताचा तो भोक्ता आहे. समाजातील अनिष्ट प्रथा-परंपरा निर्मूलनाच्या विचारांवर सत्यशोधकांनी भर देऊन नवा विधायक पर्याय समाजाला दिला. प्रथा-परंपरांची चिकित्सा करून त्यातील फोलपणा समाजासमोर मांडला. प्रथा-परंपराग्रस्त समाजाची मानसिकता व ती बदलण्याची मीमांसा केली. या प्रथांमुळे समाजाच्या उन्नतीला येणारे अडथळे, व्यक्तींच्या विकासाला पडणाऱ्या मर्यादा व समाजात निर्माण झालेली अवकळा याचे अत्यंत विदारक दर्शन घडवून समाजाला आत्मशोधी होण्यास प्रवृत्त केले. समाजातील अनिष्ट प्रथांवर घाव घालून सजग व विचारशील बनवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य सत्यशोधक समाजाने केले आहे.

मुहूर्तासारख्या अंधश्रद्धांवर सत्यशोधकांनी टीकास्त्र सोडले आहे. म. फुले यांनी परमेश्वराला निर्मिक संबोधले आहे. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. मूर्तिपूजेला विरोध केला. सत्यशोधकांनी माणसातच देव पाहाण्याचा महत्त्वपूर्ण विचार मांडला आहे. दगडाच्या मूर्तीला देवाची विविध नावे ठेवून अज्ञानी, बहुजन समाजाचे शोषण केले आहे म्हणून कवी शामराव कुलट यांनी अभंगातून पुढील भाव व्यक्त केला आहे. ते म्हणतात, 'जगी असे एक देव/ त्याचे ठायी ठेवा भाव/ धातू, मूर्तिका, पाषाण/ यात नाही देवपण' येथे धातू, माती व पाषाणाच्या मूर्तीत देव नसून त्याचे एकच रूप आहे. तो जगाचा निर्माता, निर्मिक आहे. त्याच्यावर आपला भाव ठेवावा. मूर्तिपूजेचे स्तोम हे हास्यास्पद असून त्याचा त्याग करावा असे सत्यशोधक विचार स्पष्ट झाले आहेत.

आजच्या सामाजिक प्रश्नासंदर्भात सत्यशोधक विचारसरणीचा अन्वयार्थ लावून सत्यशोधक चळवळ गतिमान करण्याची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे. आज धार्मिक मूलतत्त्ववादी शक्ती सर्व बाजूने उठाव करीत आहे. देवाधर्माच्या व संप्रदायाच्या नावाखाली पुन्हा वर्णव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात आहेत. बुवा, बापू, मा, बाबा वगैरे नावाने धर्ममार्तंडाचे

प्रस्थ वाढत असून समाज बैठका, सभा यात उपस्थित राहून मानसिक गुलामगिरीकडे पुन्हा जात आहे. धार्मिक स्थळे, मंदिरे, तीर्थक्षेत्रे जत्रा, यात्रा, कुंभमेळा वगैरे ठिकाणी प्रचंड गर्दी होत आहे. अशा ठिकाणी सामान्य माणसांची बेसुमार लूट होत आहे. प्रभावी आणि जलद आधुनिक प्रसारमाध्यमांनी सामान्य माणसाची विचारप्रक्रिया खंडित केली आहे. करणी करणे, पैशाचा पाऊस पाडून देतो, विशिष्ट अंगारा लावला तर पुत्राची प्राप्ती होईल, गुप्तधन, नरबळी, नग्नपूजा, लैंगिक शोषण अशा बुवाबाजीच्या व जादूटोणा स्वरूपाच्या अनेक घटना होत आहेत. मांत्रिकाकरवी होणारे अघोरे प्रकार वाढत असून, ऑक्टोपशी शोषण होत आहे. धार्मिक व जातीय अस्मितीचे भान वाढल्याने दंगली निर्माण होऊन संपूर्ण जीवनच असुरक्षित बनत आहे.

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण यांच्या नावाखाली प्रचंड सामर्थ्यासह नवभांडवलशाही आली आहे. श्रीमंत आणि गरिबांमध्ये दरी वाढत असून, आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे. आत्महत्या करत आहे. सहकार चळवळीला भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे सर्व सामान्य शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया, आदिवासी, दलित, शहरी झोपडपट्ट्यातील सामान्य मजूर, कामगार, बालमजूर यांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. खेड्यातील माणूस उद्ध्वस्त होत आहे, तर शहरात बकालपणा वाढतो आहे. नोकरशाहीची मग्रूर भूमिका आणि लाचखाऊ प्रवृत्ती वाढते आहे. राजकारणी लोक प्रस्थापितांचीच बाजू समर्थपणे मांडत आहेत.

प्राथमिक शिक्षणाची दैन्यावस्था, महागडे उच्च शिक्षण, परदेशी विद्यापीठे यांमुळे सामान्य विद्यार्थी शिक्षणापासून खूप दूरवर फेकला जात आहे. शिक्षणक्षेत्रातील भांडवलशाहीने गरीब, दुर्बल, वंचितांच्या शिक्षणाचे अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.

एकूणच जागतिकीकरणामुळे समाजात दोन वर्ग पडू लागले आहेत. ‘आहे रे’आणि ‘नाही रे’ या वर्गातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. समाजात मानवी समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा, बंधुता, सहिष्णुता, बुद्धिवादी आदी मूल्यांची कुचेष्टा करून कालबाह्य मानण्याची प्रवृत्ती बळावत आहे. समाजात धार्मिक, सामाजिक, मानसिक व आर्थिक गुलामगिरीची दाट छाया पडत आहे.

या बिकट परिस्थितीतून वाट काढण्यासाठी आजही सत्यशोधक चळवळीचे विचार उपयुक्त आहेत. सामान्य माणसाच्या जीवनाचा लढा लढण्यात सत्यशोधक समाजाचे विचार कोणत्याही काळात मार्गदर्शक ठरू शकतील, हे निश्चित आहे.

**(लेखक वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर येथे प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख आहेत.)**

•

## वाचकांच्या प्रतिक्रिया

‘मध्ययुगीन थोर समाजसुधारक बसवन्ना’ हा लेख वाचनीय आहे. सोप्या भाषेत बसवण्णाचे विचार मांडले आहेत. संत बसवणानी धर्माचे प्रयोजन नेमकेपणाने सांगितले आहे. माणूसकेंद्री धर्म नेमकेपणे सांगितला आहे. सदरचा लेख आवडला. समाज माध्यमात पसरवला.

**प्रसाद रेळेकर** (कोल्हापूर)

नंदकिशोर तळाशीलकर यांचा ‘धीरेंद्र शास्त्रीचा दिव्य दरबार की चोर दरबार?’ हा लेख वाचला आणि आवडलाही. भोंदू धीरेंद्र महाराजांचा पर्दाफाश अतिशय चांगल्या पद्धतीने केला आहे. बुवा – बाबा समाजात अंधश्रद्धा पसरवतात आणि चमत्काराचा दावा करतात, त्यांना विरोध केला पाहिजे. लेखातून प्रबोधन केल्याबद्दल लेखकाचे आभार.

**सीमा महाडीक,** चिंचवाड(कोल्हापूर)

‘विज्ञान म्हणजे काय?’ हा लेख महत्वाचा आहे. पृथ्वीची निर्मिती, सजीवांची निर्मिती आणि मानवी विकासाचे विविध टप्पे या लेखाच्या वाचनातून समजण्यास मदत झाली. लेखक सुधीर फाकटकर यांचे अभिनंदन व लेखनासाठी सदिच्छा!

**ऋतूराज मोरे,** बोरगाव (सांगली)



# भगवान गौतम बुद्धांची स्त्रीविषयक भूमिका : आक्षेप आणि वस्तुस्थिती

**प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड**
९८२२४३८७४३

बौद्धपौर्णिमेनिमित्त (५मे) गौतम बुद्धांच्या स्त्रीविषयक विचारांचा खंडनमंडनात्मक परामर्श घेणारा लेख.

तथागत गौतम बुद्धांनी घेतलेल्या स्त्रीविषयक भूमिकेवरही काही आक्षेप घेण्यात आले. मंगला आठलेकर यांनी 'बुद्ध हसतो आहे' या आपल्या ग्रंथात तथागतांच्या भूमिकेविषयी तीव्र शब्दांत आक्षेप घेतले आहेत. त्यातील काही आक्षेप सुरुवातीला पाहू आणि नंतर त्याविषयीचे विवेचन करू.

''बुद्धाचं समतेचं तत्त्व आणि स्त्रियांच्या संदर्भातल्या त्यांच्या उद्गारातून व्यक्त होणाऱ्या धारणा मात्र निश्चितपणे गोंधळात टाकणाऱ्या आहेत आणि जितकी अधिक बुद्धवचनं वाचत जावं तितकं बुद्धानंही स्त्रीला कमी लेखून तिच्यावर अन्यायच केला. हे अधिक ठळक होत जातं हे लक्षात येते.'' (२०१२:१५४) मंगला आठलेकर पुढे लिहितात, ''प्रजापती गौतमीला संन्यास देण्यास सुरुवातीला निकरानं विरोध केला आहे आणि स्त्रियांना संन्यास नाकारून धर्मव्यवस्थेत लिंगपरत्वे उच्चनीचता असल्याचंच एक प्रकारे कबूल केलं आहे.'' (२०१२:१५९)

तथागत गौतम बुद्धांनी स्त्रीविषयक घेतलेली भूमिका आपण प्रथम नीट समजून घेतली पाहिजे. ज्या कालखंडात स्त्रीला गुलामासारखे वागवले जाई, एक स्वतंत्र मनुष्य म्हणून तिचे हक्क व अधिकार नाकारले गेले. तिच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर अमर्याद निर्बंध लादले गेले, मुलीचा जन्म एक दुःखद घटना मानली गेली. त्या काळात तथागत टप्प्याटप्प्याने स्त्रियांना स्वातंत्र्याची वाट खुली करून देत होते. मुलीच्या जन्माचे स्वागत करण्याच्या प्रेरणा समाजाला देत होते. स्त्रियांच्या अंत:शक्ती फुलण्यासाठी त्यांना सक्षम, जबाबदार, नैतिकतेची शिस्त अंगी लावण्यासाठी पुरुषप्रधान व्यवस्थेचे भान देऊन त्यांची स्वत:च्या संरक्षणाविषयी अनुकूल भूमी तयार करत होते. हे सर्व संदर्भ आपण ध्यानात घेतले तर त्यांची स्त्रीविषयक भूमिका समजण्यास मदत होईल. अगोदरच त्यांना पूर्वग्रहाने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्यांच्या विचारांचे वस्तुनिष्ठ आकलन, मूल्यमापन करून घेता येणार नाही.

आयुष्मान आनंद यांनी तीन वेळा विनंती करूनही तथागतांनी महाप्रजापती गौतमींना संघात घेण्यास नकार दिला. आनंदांनी अन्य मार्गांनी तथागतांना विनंती करण्याचे ठरवून ते त्यांना म्हणाले, ''तथागतांनी सांगितलेला धम्म आणि विनय यांचा स्वीकार करून निब्बान प्राप्त करून घेण्यास स्त्रिया समर्थ नाहीत, असे तथागतांना वाटते काय?''(२००७:१५१) तेव्हा त्यांनी आनंदाच्या या प्रश्नांवर स्त्रियांकडे अशी पात्रता असल्याचे ठामपणे सांगितले. गौतमींनी मागितलेल्या प्रव्रज्जेच्या नकाराची कारणमीमांसा करताना बाबासाहेब आंबेडकर तथागतांचे मत पुढीलप्रमाणे नोंदवतात, ''आनंदा! माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस. स्त्री-पुरुषांतील विषमतेच्या तत्त्वांचा मी पुरस्कर्ता नाही. महाप्रजापतीच्या विनंतीला मी दिलेला नकार हा स्त्री-पुरुषांतील विषमतेवर आधारलेला नाही. तो व्यावहारिक कारणांवर आधारलेला आहे.'' (कित्ता) यावरून बुद्धांनी दिलेला संघप्रवेशाचा नकार हा स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित नव्हता, तर व्यावहारिक कारणांवर होता हे समजून घेतले की, तथागतांच्यावर केलेल्या आक्षेपांचे निराकरण होण्यास मदत होते. त्यांनी आठ अटींवर प्रजापती गौतमींना संघप्रवेशाची मान्यता दिल्याचे सांगितले जाते. त्या 'आठ मुख्य अटी' खालीलप्रमाणे-

१. भिक्षुणींनी भिक्षूंना नमस्कार करावा.
२. ज्या ठिकाणी भिक्षू नसेल त्या ठिकाणी भिक्षुणीने पावसाळ्यात राहू नये.
३. कोणत्या दिवशी उपोसथ आहे व कोणत्या वेळी उपदेश होणार आहे या दोन प्रश्नांपलीकडे भिक्षुणींनी भिक्षुसंघाशी बोलू नये.

४. भिक्षुणींनी पावसाळा संपताच प्रवारणा नावाचे अनुष्ठान करावे.

५. हातून एखादा मोठा अपराध घडल्याबरोबर- संघासमक्ष प्रायश्चित घ्यावे.

६. बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर दोन वर्षेपर्यंत जर एखाद्या स्त्रीने आपले नेमधर्म नीट रीतीने पाळले आहेत असे आढळून आले, तर तिला भिक्षुणींची दीक्षा देऊन संघात घेण्यात यावे.

७. भिक्षुणीने भिक्षुंची निंदा किंवा अपमान केव्हाही करू नये.

८. भिक्षूंचा संघ भिक्षुणीवर देखरेख ठेवील. (२००२:८८-८९)

या आठ अटी महाप्रजापती गौतमी यांनी मान्य केल्याचे आनंदांनी तथागतांना सांगितले.

या अटींसंदर्भात आठलेकर लिहितात, ''बुद्धानं घातलेल्या अटी कठोर अशा स्त्री-पुरुष विषमतेच्या द्योतक आहेत'' (२०१२:१६०), असा यावर आपला आक्षेप त्यांनी नोंदवला आहे.

तथागतांनी घातलेल्या या अटी धर्मानंद कोसंबी, डॉ.आ.ह. साळुंखे यांना नंतरच्या काळातील वाटतात. संघामध्ये काही दोष निर्माण झाले तर नियम करण्याची पद्धती होती. ही पद्धत महाप्रजापति गौतमींच्या बाबतीत अवलंबली गेलेली नाही, हे सांगताना धर्मानंद कोसंबी लिहितात, ''परंतु महाप्रजापति गौतमी के सम्बन्ध में इस पद्धति को नही अपनाया गया । यह कुछ अजीब-सा लगता है कि भिक्षुणी - संघ में कोई दोष पैदा होने से पहलेही भिक्षुणींयो पर ये आठ नियम लाद दिये गए है । इससे यह अनुमान लगाया जा सकता है की, सारी सत्ता को अपने हाथ में रखने के लिए भिक्षु-संघ ने पीछे से नियम बनाकर उन्हें विनय और 'अंगुत्तरनिकाय' मे शामिल कर दिया होगा।'' (१९८७ : १५२-१५४) धर्मानंद कोसंबीचे हे मत रास्त असून त्या संदर्भातील वस्तुस्थिती सुस्पष्ट करणारे आहे. तथागतांनी स्त्रियांना संघप्रवेश दिल्यास आपला धम्म पाचशे वर्षेच टिकेल असे म्हटले होते. त्यांच्या या विधानावरती आक्षेप घेताना आठलेकर पुढे लिहितात, ''हे त्यांचे उद्गारही स्त्रियांच्या संघप्रवेशाबाबतचा त्यांच्या मनातील पश्चात्ताप व्यक्त करणारे आहेत. बुद्धाची स्त्रियांच्याबाबतीत इतरत्र जी मतं व्यक्त झाली आहेत. त्यावरूनही पुरुषाच्या मोक्षमार्गात स्त्री हा एक अडसर आहे. ही त्यांची पक्की धारणा असल्याचं लक्षात येतं. म्हणूनच तिनं कसं वागावं या संदर्भातले नियम आधीच घालून तो स्त्रियांना प्रवेशासाठी संमती देतो.'' (२०१२ : १६३) तथागत कोणताही नियम बनविताना जोपर्यंत एखादी घटना घडत नाही तोपर्यंत नियम बनवित नसत. आठलेकर तथागतांनी स्त्रियांना आधीच नियम घालून प्रवेशासाठी संमती दिल्याचे सांगतात. याचाच अर्थ, ज्या गोष्टींचा तथागतांशी संबंध नाही. त्यावरून त्यांना जबाबदार धरायचे हे धोरण त्या अवलंबताना दिसतात. याच पार्श्वभूमीचा विचार करता आपण प्रवर्तित केलेले धम्मचक्र आता कोणीही उलटे फिरवू शकणार नाही, असे तथागतांनी म्हटले होते. याकडे त्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. आपला धम्म स्त्रियांना प्रवेश दिल्यास पाचशे वर्षेच टिकेल असे तथागतांनी म्हटले होते, असे सांगितले जाते. या संदर्भात एका नवीन मुद्द्यांकडे लक्ष वेधताना धर्मानंद कोसंबी म्हणतात, ''विनयपिटक की अपेक्षा 'सुत्तपिटक' प्राचीनतर है । तथापि उसमें कुछ सुत्त पीछे से जोड दिये गऐ है और शायद यह सुत्त भी उन्हीं में से है । ईसा से पहले प्रथम या द्वितीय शताब्दी में जब महायान - पन्थ का प्रसार तेजी से होने लगा तब यह सुत्त लिखा गया होगा। उसमें सद्धर्म से मतलब है स्थविरवादी पंथ। सुत्तकार का भविष्यवाद कदाचित यह हो की भिक्षुणी - संघ की प्रस्थापना के कारण वह पाँच सौ वर्ष जीवित रहेगा और उसके पश्चात सर्वत्र महायान - सम्प्रदाय का प्रसार होगा । इस भविष्य से ही यह सिद्ध होता है कि यह सुत्त भगवान बुद्ध के परिनिर्वाण से पाँच सौ वर्ष बाद लिखा गया था ।'' (२००७:४६०)

तथागतांनी महाप्रजापती गौतमींना या अटी घातल्या नसल्याकडे कोसंबींनी आपले लक्ष वेधले आहे. त्यामुळे या अटीवरून बुद्धांनी स्त्रियांवर अन्याय केल्याचा, त्यांना गौण लेखल्याचा आक्षेप घेणे योग्य ठरणार नाही. आठलेकरांचे तथागतांवर इतर काही महत्त्वाचे आक्षेप काय आहेत ते पाहू.

''....शेवटी बुद्धही स्त्रीकडे फक्त पुरुषाच्या मोक्षमार्गात अडथळा निर्माण करणारं एक 'शरीर' म्हणूनच पाहातो.'' पुढे लिहितात, ''तिच्या हातून जे गुन्हे, ज्या चुका घडतायत त्या घडू नयेत म्हणून कोणती खबरदारी घ्यावी हे तिला का सांगत नाही. ...बुद्धाच्या मते, एखादी स्त्री चुकीचं वागत असेल उदा. मातापुत्तसुत्त तर बुद्ध

साऱ्या स्त्रीजातीच्या संदर्भात अशी विधानं कशी करतो, की त्यालाही पुरुषाचंच हित महत्त्वाचं वाटत होतं? आणि तसं जर असेल तर त्या अर्थानं बुद्धानंही पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचंच प्रतिनिधित्व केलं असं नाही का वाटत?'' (२०१२:१५६-१५८)

आठलेकरांच्या वरील आक्षेपांचा सूर हा तथागतांनी पुरुषी समाजव्यवस्थेचं नेतृत्व केलं, स्त्रियांना हीन लेखलं, स्त्रियांच्या हातून चुका घडू नयेत म्हणून कोणतीही खबरदारी घेतली नाही किंवा त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी स्त्रियांना स्वतंत्रपणे उपदेश केला नाही, असा त्यांच्या आक्षेपांचा सूर आहे. यासंदर्भात तत्कालीन सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली तर काही गोष्टी कळू शकतील. एक तर त्यांचा स्त्रियांच्या संघप्रवेशाचा नकार हा स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित नव्हता, तर तो व्यावहारिक कारणांवर आधारित होता, हे प्रथम समजून घेतले पाहिजे. त्यांचा नकार हा जर स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित असता तर त्यांनी आनंद यांना स्त्रियांसुद्धा धम्म आणि विनय यांचा स्वीकार करून निब्बान प्राप्त करून घेण्यास समर्थ असल्याचे सांगितले नसते. तथागतांच्यासमोर निर्माण झालेली व्यावहारिक अडचण ही तत्कालीन समाजव्यवस्थेत असल्याकडे लक्ष वेधून तथागतांच्या निर्णयाचा पुरस्कार करताना प्रफुल्लकुमार लोखंडे लिहितात, ''बुद्धाला एकतर नामशेष करण्याचे प्रयत्न चालले होते. त्यातही आणखी एक महान संधी विरोधकांना नेमकीच मिळेल या जाणिवेने बुद्धाचा हा - निर्णय चुकीचा नव्हता.'' (१९९०:६४-६५) आठलेकर तत्कालीन समाजव्यवस्था नीट ध्यानात घेत नाहीत.

या संदर्भातील तथागतांची भूमिका नीट स्पष्ट होण्यासाठी डॉ.आ.ह.साळुंखे लिहितात, ''स्त्रियांचे सर्व प्रकारचे अधिकार नाकारून त्यांच्या गुलामगिरीची समाजव्यवस्था निर्माण करणारे लोक आणि स्त्रियांना त्यांचे अधिकार देऊन स्वतंत्र बनवीत असताना येणाऱ्या अडचणी ध्यानात घेऊन धीमेपणाने पावले टाकू पाहाणारा महापुरुष यांच्यातील अंतर ध्यानात घेतले नाही, तर ती केवळ त्या महापुरुषाच्या मूल्यमापनातील चूक ठरणार नाही, तर तो एका बाजूने आपला कृतघ्नपणाही ठरेल आणि दुसऱ्या बाजूने समतेच्या आणि स्वतंत्रतेच्या चळवळी मोडून टाकणाऱ्यांच्या हाती कोलित देण्याचा आत्मघातकी प्रकारही ठरेल.'' (२००७:४६१) धर्मानंद कोसंबी आणि डॉ.आ.ह.साळुंखे यांचे तथागत बुद्धांवरील ग्रंथ आठलेकरांच्या आधीच प्रसिद्ध झालेले आहेत. त्यामध्ये स्त्रियांच्या संघप्रवेशाविषयीची विस्तृत चर्चा आलेली आहे. त्याची त्यांनी का नोंद घेतली नाही? कोसंबी, डॉ.साळुंखे यांनी केलेल्या मांडणीकडे त्यांचा साधा उल्लेखही न करता त्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. अनेक ग्रंथांमध्ये आलेल्या यासंबंधीच्या मांडणीकडे दुर्लक्ष करून पुन्हा त्याच आक्षेपांची पुनरूक्ती करणं हे योग्य नव्हे. आठलेकर, बुद्ध आणि मनुस्मृतीचा कर्ता यांना समान लेखतात आणि इथेच मोठी चूक करतात. त्यावरून ही त्यांनी घेतलेल्या भूमिकेत गोंधळ उडालेला दिसतो. तथागतांनी स्त्रियांना स्वतंत्र उपदेश केला नसल्याचे त्या लिहितात, परंतु तथागतांनी चारित्र्य आणि शीलाला साजेसेच वर्तन करण्याचा गृहस्थांना केलेला उपदेश स्त्रियांना लागू होत नाही काय? यावरून आठलेकरांचे आक्षेप निराधार असल्याचे स्पष्ट होते.

अंगुत्तर निकाय चक्कुत निपात, अपण्णकवग्गात कम्बोज सुत्त आहे. त्यामध्ये बुद्ध आनंदांना म्हणतात, ''आनंदा, स्त्री वर्ग हा संतापी, ईर्ष्याळू, मूर्ख, मत्सरी आणि बुद्धिहीन असतो. आनंदा, हे कारण आहे की ज्यामुळे अशा प्रकारच्या स्त्रिया सभेमध्ये बसत नाहीत, स्वतंत्र उद्योग करत नाहीत.'' (२०१२:१५८)

आनंदाने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना तथागतांच्या तोंडी वरती आलेल्या विधानांवर आक्षेप नोंदवताना मंगला आठलेकर लिहितात, ''पुरुषाच्या अध:पतनाची सगळी जबाबदारी फक्त स्त्रीचीच आहे? 'विषारी सापाला जवळ करावं पण एकांतात स्त्रीबरोबर कधी बोलू नये' म्हणणारा बुद्ध पुरुषाला झुकतं माप तर देतोच; पण स्त्रीच्यासंदर्भात अगदी एकांगी आणि अन्यायकारक अशी विधानं करतो.'' (कित्ताः१५८) तथागतांनी भिक्खूंना उपदेश करताना वरील विधान आलेले आहे. भिक्खूंच्या शीलपरिपालनाबाबत तथागत काही कठोर नियम सांगत असतील तर त्यावरती आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. पण तथागतांनी स्त्रियांच्याविषयी भिक्खूंना जो उपदेश केला आहे. त्यातील स्त्रियांविषयीची विशेषणं जरूर खटकणारी आहेत. पण ही तथागतांच्या तोंडची भाषा नसण्याचीच दाट शक्यता आहे. हे आपण पुढे पाहाणारच आहोत. पण जी विधानं किंवा उपदेश तथागतांच्या तोंडचा नसेल

त्याबद्दल त्यांना जबाबदार धरणं योग्य ठरेल का? याचा देखील विचार झाला पाहिजे.

अंगुत्तरनिकाय एकक निपात असंभववग्गाच्या द्वितीय वर्गात बुद्धांच्या तोंडी जे विधान आहे त्यात ते म्हणतात, ''भिक्षुंनो, स्त्री ही सम्यक संबुद्ध होऊ शकेल याची कणभरही शक्यता नाही. पुरुष मात्र सम्यकसंबुद्ध होऊ शकतो.'' (कित्ताः१६५) तथागत बुद्धांच्या वरील विधानांवर आक्षेप नोंदवताना आठलेकर लिहितात, ''....म्हणजेच बुद्ध बनण्यासाठी 'पुरुष' असणं हे बुद्धाच्या मते अत्यंत गरजेचं आहे. जो पुरुष नाही तो बुद्ध बनू शकत नाही. 'स्त्री ही बुद्ध बनू शकते; पण ते केवळ तिच्या पुण्याने तिला जेव्हा भावी संसरणात पुरुष जन्म प्राप्त होईल तेव्हाच' असं बुद्ध म्हणतो याचा अर्थ, मुळात पुरुष जन्म मिळण्यासाठी पुण्य करणं आवश्यक आहे, असं तो गृहीत धरतो.'' (कित्ताः१६५) हे सुत्त आणि त्यावरील आठलेकरांच्या आक्षेप याविषयीचे विवेचन पुढीलप्रमाणे पाहू.

तथागत बुद्धांनी स्त्रियांसुद्धा धम्म आणि विनय यांचा स्वीकार करून निब्बान प्राप्त करून घेण्यास समर्थ असल्याचे आनंद यांना सांगितले होते, हे आपण पाहिले. एकदा ते अशा प्रकारचे सामर्थ्य अंगी असल्याचे सांगत असतील तर दुसऱ्या सुत्तात ते स्त्री ही सम्यकसंबुद्ध होण्याची शक्यता नाकारून पुरुष मात्र सम्यकसंबुद्ध होऊ शकतो असे सांगतात यामध्ये विसंगती जाणवत नाही काय? याचाच अर्थ, स्त्रियांना सम्यकसंबुद्धत्व नाकारणारं सुत्त तथागतांचे नसून नंतर ते कोणीतरी घातले आहे, असाच याचा अर्थ होतो. राहुल सांकृत्यायन, धर्मानंद कोसंबी यांनी अशी काही सुत्ते नंतर तिपिटकात घातल्याची उदाहरणे दिल्याचे आपण पाहिले आहे. डॉ. आ.ह. साळुंखे देखील तथागतांनी संघप्रवेशावेळी स्त्रियांना आठ कठोर अटी घातल्या त्यावेळी तथागतांच्या तोंडी आढळणारी सगळी भाषा त्यांची नसण्याची शक्यता व्यक्त करतात. त्यांच्या परिनिब्बानानंतर आनंदांवर अनेक आरोप ठेवण्यात आले. त्यापैकी स्त्रियांच्या संघप्रवेशाचा एक आरोप होता. याकडे आपले लक्ष वेधून ते पुढे लिहितात, ''याचा अर्थ स्त्रियांना संघात प्रवेश देऊ नये, असा एक विचारप्रवाह संघामध्ये प्रबळ होता.'' (२००७:४५९) याचाच अर्थ, ज्यांना तथागतांनी स्त्रियांना संघप्रवेश देऊ नये असे वाटत होते. त्यांनी तथागतांच्या हयातीत प्रश्न उपस्थित करायला हवा होता. त्याऐवजी त्यांनी आनंदांना दोषी धरले. याचे महत्त्वाचे कारण नोंदवताना डॉ.साळुंखे पुढे लिहितात, ''स्त्रियांना संघात प्रवेश देण्याच्या बाबतीत तथागत अगदी प्रतिकूल होते, असे दाखविले असता त्या प्रवेशाची सगळी जबाबदारी आनंदावर टाकणे सोपे होणार होते. हे उद्दिष्ट साधण्यासाठी तथागतांच्या तोंडी अशा प्रकारची विधाने नंतर घालण्यात आली असावीत, या शक्यतेचाही आपण विचार केला पाहिजे, असे मला वाटते'' (कित्ता) या सर्व शक्यता ध्यानात घेतल्या की, वरती आलेले सुत्त नंतर कोणीतरी तथागतांच्या तोंडी घातल्याचे स्पष्ट होते.

श्रावस्तीमध्ये पसेनदी राजाला मुलगी झाल्याच्या प्रसंगाचे वर्णन संयुत्तनिका यामध्ये आलेले आहे. मुलगी झाल्याचे समजताच राजा पसेनदी उदास झाल्यानंतर तथागत त्याला म्हणाले, ''काही स्त्रिया या पुरुषांपेक्षाही चांगल्या असतात. हे राजा तुझ्या मुलीचा चांगला सांभाळ कर. शहाण्या, गुणी, मोठ्यांचा, सासूचा आदर करणाऱ्या निष्ठावान, पतिव्रता अशा स्त्रियाही असतात. अशा उदात्त, सदगुणी बाईच्यापोटी शूर योद्धा जन्माला येऊ शकतो, जो राज्यकारभार चालवतो.'' (२०१२:१६६) तथागतांच्या या उपदेशावर आक्षेप घेताना मंगला आठलेकर लिहितात, ''काही स्त्रिया या पुरुषापेक्षाही चांगल्या असतात, हे उद्गार बुद्ध काढतो. पण 'चांगल्या' होण्यासाठी त्यांच्याकडे पतिनिष्ठा, सासूचा आदर करणं हे गुणविशेष असणंही गृहीत धरतो. शिवाय सासूविषयी आदर असला पाहिजे म्हणताना सासूनं तिच्याशी तितकंच आदरानं वागावं कसं किंवा नवऱ्याविषयी भक्तिभाव हवा म्हणताना या नवऱ्याच्या मनात तिचं स्थान काय असावं, तिच्या गुणांबद्दल कौतुक असावं, तिच्या बुद्धिमत्तेचा त्यानं आदर करावा किंवा नाही, याबद्दल बुद्ध काहीच म्हणत नाही. स्त्रीचं नवऱ्याशी, इतरांशी असलेलं वर्तन हे आदर्श असलं पाहिजे तरच ती सद्गुणी? अवतीभवतीची माणसं तिच्याशी कसं वर्तन करतात हे महत्त्वाचं नाही, असं बुद्धाचं म्हणणं आहे का? राजा पसेनदीची समजूत बुद्धानं ज्या शब्दात घातली आहे ते शब्द तरी हेच सुचवतात.'' (कित्ता)

या प्रसंगाविषयीचे अत्यंत महत्त्वाचे विवेचन करताना डॉ.आ.ह.साळुंखे लिहितात, ''मुलगा आणि मुलगी यांना समान मानावे, असा विचार आपल्या

अंत:करणात जपणाऱ्या व्यक्तींनी समाधानाने आणि आनंदाने मोहरून यावे अशा प्रकारचा सात्विक उपदेश तथागतांनी राजा पसेनदीला केला आहे. मुलगी झाल्याचे ऐकून उदास झालेल्या राजाला चुकीच्या मानसिकतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न त्यांनी येथे केला आहे. पुत्र ज्याप्रमाणे कर्तबगार असू शकतात, त्याप्रमाणे कन्यादेखील कर्तृत्वाच्या क्षेत्रात उंच झेप घेऊ शकतात, हे त्यांनी राजाला पटवून दिले आहे. एवढेच नव्हे, तर प्रसंगी स्त्री ही पुरुषापेक्षाही वरचढ कर्तृत्व गाजवू शकते, हे त्यांनी त्याला समजावले आहे. स्त्रियांकडे उच्चकोटीची बुद्धिमत्ता नसते, अशी परंपरागत समजूत होती. ही समजूत खोटी आहे, हे दर्शविण्यासाठी त्यांनी स्त्रीला उद्देशून 'मेधाविनी' असे विशेषण लावले आहे. याचा अर्थ, स्त्रियांच्या ठिकाणी असलेल्या अंत:शक्तीचे भान त्यांना पुरेपूर होते, हे स्पष्ट आहे.'' (२००७:४५५) यावरील विवेचनावरून आठलेकरांच्या आक्षेपातील निरर्थकता ध्यानात येईल.

तथागतांचा उपदेश क्रांतिकारक होता हे नोंदवून डॉ.साळुंखे या उपदेशातील वस्तुनिष्ठता अधोरेखित करताना लिहितात, ''...त्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले असता त्यांच्या भूमिकेमधील काळावर मात करणाऱ्या क्रांतिकारकत्वाचे नीट आकलन होऊ शकेल. शिवाय, तथागतांनी येथे स्त्रीकडून जशी शीलाची अपेक्षा केली आहे, तशीच अन्यत्र वारंवार पुरुषाकडूनही अपेक्षा केली आहे, हे विसरता कामा नये. तसेच, एखाद्या स्वयंस्वीकृत उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठी वेगळा जीवनक्रम स्वीकारणाऱ्या स्त्रियांचा अपवाद वगळता इतर बहुतांश स्त्रियांच्या दृष्टीने मातृत्व हे स्त्रीत्वाला पूर्णत्व आणत असते, हे समतेचा आग्रह धरणाऱ्यांनीही नाकारू नये, हेच योग्य होय.'' (कित्ताः ४४६) या वरील सर्व विवेचनावरून आक्षेपांतील निरर्थकता स्पष्ट होते.

**निष्कर्ष**

१. तथागतांच्या जीवन-चरित्राचा, तत्त्वज्ञानाचा जसा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या काही विचारांवर आक्षेपदेखील घेण्यात आले.

२. त्यांच्या विरोधकांनी तथागतांचे विचार खोडून काढणे अशक्य असल्याने त्यांना स्वीकारल्याचे, आत्मसात केल्याचे भासविले आणि त्यांच्या मूळ विचारांचा चेहरा-मोहरा बदलला.

३. तथागतांच्या समकालिनांनी जसे त्यांच्या भूमिकांवर त्या काळात आक्षेप घेतले तसेच त्यांच्यानंतर आधुनिक काळातील विरोधकांनी काही आक्षेप घेतले.

४. वि.दा. सावरकर, श्री.व्यं. केतकर, मंगला आठलेकर इत्यादींनी जसे आक्षेप घेतले तसेच अनेक आक्षेपांवर राहुल सांकृत्यायन, धर्मानंद कोसंबी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.आ. ह. साळुंखे, प्रफुल्लकुमार लोखंडे इत्यादींनी त्या आक्षेपांचा मूल्यमापनात्मक परामर्श घेतला.

५. मूळ पाली तिपिटकात प्रक्षिप्त करण्यात आलेले विचार शोधून सर्वांसाठी एक असणारी पाली तिपिटकाची चिकित्सक आवृत्ती तयार होणे गरजेचे आहे.

६. तथागतांना अवतार मानून, त्यांच्याभोवती दैवी वलय निर्माण करून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आशयच हिरावून घेण्याचा जसा प्रयत्न झाला तसाच त्यांना अवतार मानून, त्याला अलौकिकत्वाचे वलय देऊन तथागतांसारखे कोणालाही बनता येणार नाही. हे बिंबवून त्यांना सर्वसामान्यांपासून तोडण्याचा प्रयत्न झाला.

**संदर्भ**

१. आठलेकर मंगला, 'बुद्ध हसतो आहे', राजहंस, पुणे, २०१२

२. आंबेडकर भीमराव रा., (अनु.) तळवटकर, चिटणीस, रेगे, 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई-१, आवृत्ती २१ वी, २००७

३. आपटे वा. गो., 'बौद्ध धर्माचा साद्यंत इतिहास - बौद्धपर्व', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००२.

४. कोसंबी धर्मानंद, 'भगवान बुद्ध : जीवन और दर्शन', हिंदी अनुवाद - श्रीपाद जोशी, प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से लोकभारती प्रकाशन, इलाहाबाद १९८७

५. लोखंडे प्रफुल्लकुमार, 'बुद्धधर्मावरील १६ आरोप आणि त्यांचे खंडन', सेन्ट्रल प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती, १९९०

६. साळुंखे आ.ह., 'सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध', लोकायत प्रकाशन, सातारा, २००७

**(लेखक बौद्ध साहित्याचे अभ्यासक असून सध्या श्री विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठवडगाव येथे प्राध्यापक आहेत.)**

●



# संत चोखामेळा यांच्या चरित्रातील दंतकथांचा अन्वयार्थ

**डॉ. दत्ता सरगर**
९४२३५६३५८६

चिकित्सा

२० मे संत चोखामेळा यांची पुण्यतिथी. यानिमित्त संत चोखामेळांच्या चरित्रामधील चमत्कारकथांची तार्किक चिकित्सा करीत त्यांमधून दडलेल्या सामाजिक वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणारा लेख.

समाजात संत, महात्मा, विभूती, महापुरुष, अवतारी पुरुष म्हणून घेणाऱ्या अनेक व्यक्ती असतात. त्यांच्या जीवनचरित्रात गूढता,अद्‌भुतता, चमत्कारिक घटना, प्रसंग, कथा असतात. सुमारे ७०० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात होऊन गेलेले संत चोखामेळा व त्यांच्या परिवारातील सदस्यांच्याबाबतीत अशाच काही दंतकथांचे वलय निर्माण झाले आहे. त्यामुळे त्यांचे खरे चरित्र समजत नाही; परंतु या कथांतून तत्कालीन सामाजिक स्थितीची कल्पना येण्यास मदत होते म्हणून चोखामेळा आणि त्याच्या परिवारासंबंधी दंतकथांचा शोध घेणे आवश्यक वाटते. त्यांचे स्वरूप, वैशिष्ट्ये जाणणे महत्त्वाचे आहे. या दंतकथांचा मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणेही गरजेचे आहे. दंतकथांपाठीमागची भूमिका समजून घेणे आवश्यक वाटते.

वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे व मानाचे स्थान असणारे चोखामेळा हे एक श्रेष्ठ दर्जाचे संत होते. त्यांनी आपल्या भावभक्तीच्या, शुद्ध अंत:करणाच्या व नैतिक आचरणाच्या जीवावर वारकरी संप्रदायात सन्मानाचे स्थान मिळवले होते. त्यांच्या अभंगातूनही तत्कालीन अस्पृश्यांची स्थिती काय होती, त्यांना कोणकोणत्या संकटांना आणि मानसिक कोंडमाऱ्याला सामोरे जावे लागले होते याचे अतिशय प्रभावी चित्रण आढळून येते. चंद्रभागेच्या वाळवंटात संत नामदेवाच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय विस्तारित होत गेला. त्या चळवळीतून निर्माण झालेले प्रतिनिधी म्हणजे चोखामेळा होय. त्यांच्या जीवनचरित्रात अनेक दंतकथा आलेल्या आहेत.

खरे तर, चोखामेळा यांच्या जन्मापासूनच दंतकथा किंवा लोककथांना सुरुवात होते.

उदा. कोरेगावच्या पाटलांचे नवसाचे आंबे पांडुरंगाला देण्यासाठी चोखोबांचे माता-पिता जात असताना पांडुरंग वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात त्यांच्यासमोर आला. त्याने त्यांच्याकडे भूक लागल्याने आंबा खाण्यास मागितला. त्यांनी तो दिला; पण आंबा आंबट असल्याने अर्धवट चोखलेला आंबा चोखोबांच्या आईने तसाच ओटीत ठेवून दिला. नंतर पुन्हा पाहिले तर त्या आंब्याचे रूपांतर सुंदर अशा बालकात झाले होते. ते बालक म्हणजे चोखोबा होय. इतकेच नव्हे तर चोखोबांच्या मुलाच्या जन्माबाबतही ही कथा काहीशी अशीच आहे. तिचा सारांश पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल. चोखोबांही दीर्घकाळ मूलबाळ नव्हते. एके दिवशी देव वृद्ध ब्राह्मणाच्या रूपाने चोखोबांच्या घरी गेले. भूक लागली म्हणून काही खाण्यास मागू लागले; पण आम्ही महार आहोत तेव्हा तुम्हाला आमचे अन्न चालणार नाही, असे चोखोबांची पत्नी सोयराबाई म्हणते. तरीही ब्राह्मण आपला हट्ट सोडत नाही तेव्हा तिने वाटीत दहीभात दिला. तो त्या ब्राह्मणाने खाल्ला व तृप्त झाला. जाताना त्याने सांगितले की, ‘वाटीतील हे उरलेले अन्न तू खा. तुला पुत्र लाभ होईल.’ त्यातूनच नंतर सोयराबाईस दिवस गेले. कालांतराने पुत्रलाभ झाला. त्याचे नाव कर्ममेळा. सोयराबाईच्या बाळंतपणाच्यावेळीही चोखोबांच्या घरी कोणी नव्हते. तेव्हा प्रत्यक्ष पांडुरंग निर्मळेच्या (सोयराबाईची नणंद) रूपात आला आणि त्यांनी सोयराबाईचे बाळंतपण केले.

या दोन्ही कथातील समान स्थळे बरीच आहेत. या दोन्ही कथा जन्मकथा आहेत. चोखामेळा, कर्ममेळा यांच्या जन्मासंबंधी काही माहिती देतात. त्या दोन्ही

कथेत वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात देव आलेला आहे. येथे देव ब्राह्मण म्हणजे उच्च वर्णियांच्याच रूपातच समोर आलेला आहे. तेव्हा अन्य जातीच्या लोकांच्या रूपात देव कधीच फारसा येताना दिसत नाही. म्हणजे या कथांचा जो कोणी निर्माता असेल त्याला हेच सांगायचे असेल की, ब्राह्मण वर्ण देवांना रूप घेण्यासाठी पवित्र वर्ण आहे. दुसरे जाती वर्ग-वर्ण अपवित्र आहेत. या कथा लेखकाला ब्राह्मण वर्णास उच्च ठिकाणी ठेवायचे आहे आणि समाजात आपले वर्चस्व निर्माण करावयाचे आहे किंवा जे वर्चस्व आहे त्याला बळकटी द्यावयाची आहे. बहुजन समाजात संत, महात्मा, महापुरुष जन्माला येण्यासाठी ब्राह्मणांच्या कृपाप्रसादाची गरज आहे. ब्राह्मण त्यांचे निर्माते आहेत, ही या कथांच्या मागील भूमिका तर नसेल? चोखामेळा आणि त्याचा मुलगा कर्ममेळा यांचा जन्म ब्राह्मणांच्या उष्ट्यातून झाला आहे, हे या कथेतून सांगून पुन्हा त्यांना हीन लेखण्याचा तर हा प्रकार नाही ना? किंवा असे म्हणता येईल की, ब्राह्मणांचे उष्टे खाल्ले तर तुम्हाला मूलबाळ होऊ शकते किंवा ब्राह्मणांच्या उष्टेसुद्धा किती पवित्र आहेत हे लोकांच्या मनावर बिंबवायचे नाही ना?

सर्वसामान्य माणसाचा जन्म हा त्याच्या आईच्या पोटातून म्हणजेच जननेंद्रियातून होतो. पण देव, विभूती, संत यांचे जन्म मात्र आईच्या पोटातून न होता ते विविध वस्तूतून झालेल्या अनेक कथा ऐकत असतो. नाथपंथीयातील सर्व नाथ, साईबाबा, स्वामी समर्थ, गणपती अशा अनेक व्यक्ती आणि देवांचे जन्म हे अयोनीज समजले जातात. म्हणजे हे आईच्या पोटातून जन्माला आलेले नाहीत, ते अयोनीज आहेत. कॉ.शरद पाटील यांच्या मतानुसार अयोनीज या शब्दाचा मूळ अर्थ घर असा होतो. त्याला 'अ' हा प्रत्यय लागल्यानंतर घराबाहेर, कुठेतरी, रानात, गावाबाहेर त्या व्यक्तीचा जन्म झाला असा त्याचा अर्थ आहे. संत चोखामेळा यांचा जन्म आंब्यातून झाला अशी कथा आहे. याचा अर्थ असा होतो की, त्यांचा जन्म कुठेतरी रानात, गावाबाहेर झालेला असावा म्हणजेच अयोनीज आहे. पण त्यांचा जन्मसुद्धा आईच्या पोटातून झालेला आहे; पण ते एक महान विभूती संत होते, हे लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी त्यांचा जन्म हा आंब्यातून झालेला आहे, असे सांगितले जाते. यातून त्या महापुरुषाचा मोठेपणा, त्याचे महात्म्य सांगण्यासाठी अशा कथा मुद्दामहून त्यांच्या चरित्रात घुसडल्या जातात. यातून त्या महापुरुषेविषयी अनेक वेळा अंधश्रद्धा, गैरसमज निर्माण होतात.

देव सोयराबाईच्या बाळंतपणासाठी सामग्री घेऊन निर्मळेच्या रूपात आला आहे, या कथेतून पुढील बाबी बहुजनांच्या मनात बिंबवायच्या आहेत काय? देव आपल्या भक्तांसाठी संकटसमयी हाक मारल्याबरोबर धावून येतो आणि संकट दूर करतो, असेच या कथेतूनही सांगावयाचे आहे.

दुसऱ्या एका कथेत गावाच्या मुख्य अंमलदाराच्या घोड्याचा खरारा करण्यासाठी चोखामेळ्यास सांगितले तेव्हा पांडुरंगाने त्या घोड्याचा खरारा केला. ही कथा विठ्ठलाच्या मनाचा मोठेपणा सांगण्यासाठी वारकरी विचारधारेतून प्रकट झालेली आहे. वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत विठ्ठल आहे. त्यामुळे विठ्ठलाचे महात्म्य सामान्य लोकांना पटावे, यासाठी या कथा संतचरित्रात येत राहातात. त्यामुळे संतचरित्र अधिक रोचक होतात. लोकप्रिय होण्यासही मदत होते. संतचरित्र कमी वेळेत कमी शब्दात लोकांपर्यंत पोहोचतात व दीर्घकाळपर्यंत स्मरणात राहातात म्हणून तर या कथा/गोष्टींच्या माध्यमातून लोकांना देव-देवतांच्या चरित्रकथा रंगवून सांगितल्या जातात. अत्यंत सोप्या पद्धतीने अज्ञ समाजाला भक्तीची, नीतीमूल्यांची शिकवण देता यावी यासाठी या कथांचा वापर केलेला दिसतो.

दंतकथा विविध तत्त्वज्ञानाच्या वाहक असतात. या कथा मनोरंजन करीत असतात. त्यामध्ये अस्पष्टपणे सामाजिक इतिहासाचे, तत्कालीन चालीरीती, परंपरा, मानवी स्वभावाचे, विविध धार्मिक प्रवाहाचे, तत्कालीन सामाजिक स्थिती-गतीचे दर्शन घडते. या कथा जगाच्या पाठीवर सर्व देशातील संत, महात्मे यांच्या जीवनचरित्रात सर्रासपणे आढळतात. या कथांवर लोकांची मोठी श्रद्धा असते. श्रद्धाळू मन असे घडलेच असेल असेच मानत राहाते. समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, संकेत नियम असतील आणि एखाद्या व्यक्तीने मोडले, तर त्या व्यक्तीला शोषणकर्त्यांनी छळल्याच्या कथाही प्रत्येक संतांच्याबाबतीत दिसतात. अशा या छळ कथांमधूनही आपणास सत्य-असत्य त्याचा संघर्ष दिसतो. हजारो वर्षे चालत आलेल्या स्वतःच्या स्वार्थाच्या हक्कांवर आणि

अधिकारांवर कोणी गदा आणू पाहात असेल, तर त्या संताला मारहाण करणे.

त्यातूनही तो ऐकत नसेल तर त्याला जीवे मारणे अशा घटना जगाच्या इतिहासात घडून गेलेल्या दिसून येतात. उदा. येशू ख्रिस्ताचा मृत्यू, कोपर्निक, सॉक्रेटिस, संत तुकाराम, कच्चे मडके ठरवलेले संत नामदेव, संत कान्होपात्रा इत्यादींच्या सर्वांच्या जीवनात छळ कथा दिसतात. अर्थातच अंध धर्ममार्तंडांकडून होणाऱ्या छळास या संतांनी कसे सहन केले यावर त्यांचे संत, महात्मा या पदाची कसोटी ठरवली जाते. चोखामेळा यांच्या जीवनातही त्यांना त्यांच्या अस्पृश्य जातीच्याआधारे प्रचंड छळ करण्यात आला होता.

परमेश्वर भक्तीचा अधिकार सर्वांना आहे. परमेश्वराच्या समोर जात, धर्म, वर्ण, उच्च-नीच असा प्रकार नसतो, असे ज्ञानेश्वरीमध्ये सांगितलेले आहे. 'म्हणोनि भक्ति गा एत सारे जाति अप्रमाण म्हणोनि कुळ जाति वर्ण हे अवघेचि गा अकारण.' प्रत्यक्ष व्यवहारात मात्र अस्पृश्य समाजाला पांडुरंगाच्या देवळात जाऊन दर्शन घेण्यास बंदी होती. त्यांनी कधी देवळात जाऊ नये यासाठी त्यांच्यावर विविध बंधने घातली होती. 'महाद्वारी चोखामेळा विठ्ठल पहात असे डोळा', या अभंगातून चोखामेळा विठ्ठल मंदिरात कोठे उभा होता हे कळते.


चोखामेळा चरित्रात ब्राह्मणांनी चोखोबांची क्षमा मागितल्याच्या कथा येतात. कथा पुढीलप्रमाणे सांगितली जाते. चोखोबांनी विठ्ठलाच्या देवळात जाऊन विठ्ठलाचे चोरून दर्शन घेतले. त्यामुळे देव बाटला. सर्व लोक चोखोबांना दोष देऊ लागले. त्यावेळी मद्रासमधील एक धनाढ्य व्यापारी विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेला होता. त्याला वरील प्रकार समजला. त्याने विठ्ठलाचे शुद्धीकरण करण्याचा घाट घातला. सर्व खर्च, साधनसामग्री त्याने पुरविली. पंगतीत सर्वांना जेवण वाढताना तो म्हणत होता भरपूर खा. तो नेसत्या वस्त्राशिवाय फिरत होता. तो आधीच काळा होता. त्यात तो पुन्हा जास्त काळा दिसू लागला. गळ्यात जानवे नव्हते. कुजबुज सुरू झाली. त्याला प्रश्न विचारला, ''तुझी जात कोणती?'' त्याने उलट प्रश्न केला, ''तुम्ही महार की ब्राह्मण?'' ब्राह्मणांनी गळ्यातील जानवी चाचपण्यासाठी गळ्यात हात घातला, पण त्यांच्या गळ्यात जानवी नव्हती. यावर तो व्यापारी म्हणाला, ''तुमची जानवी चोखोबांच्या घरी आहेत.'' सगळा ब्राह्मणवृंद तिकडे धावला. चोखामेळा यांच्या तुळशी वृंदावनाजवळ जानवी दिसली. ती घेऊन ब्राह्मणवृंद देवळात आला. तेथे व्यापारी व त्याचा लवाजमाही नव्हता. मग त्यांना कळले की, तो व्यापारी नसून व्यापाऱ्याच्या रूपात पांडुरंग झाला होता. तो संत चोखामेळ्यासाठी आला होता. त्या सर्वांनी चोखोबांची क्षमा मागितली.

दुसरी कथा काहीशी अशी सांगितली जाते. चोखोबाला गावाबाहेर चंद्रभागा नदीच्या पलीकडे हाकलून दिले. देव तेथे जेवण्यास गेला. देव जेवताना दही त्याच्या पितांबरीवर सांडले. त्याबद्दल चोखोबा सोयराबाईंना रागाने बोलले. हा सर्व प्रकार एका ब्राह्मणांनी ऐकला. त्याला वाटले, विठ्ठल चोखोबांच्या घरी जेवायला जातो म्हणजे काय? चोखोबाला तो ब्राह्मण जाब विचारतो. देव जेवायला आला आहे हे चोखोबांनी दिलेले उत्तर त्याला पटत नाही. चोखोबा खोटे बोलतो आहे म्हणून ब्राह्मण रागाने चोखोबांच्या गालावर थोबाडी मारतो. नंतर त्याने विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी गेल्यावर पाहिले की, विठ्ठलाचा गाल सुजलेला आहे व पितांबरीवर दह्याचे डाग आहेत. तो आश्चर्यचकित झाला! तो आल्यापावली चोखोबांकडे गेला. त्याने त्यांची क्षमा मागितली.

तिसरी कथाही काही थोड्याफार फरकाने अशीच आहे. चोखोबांनी देव बाटविला म्हणून त्याला बैलाच्या सुळावर देण्यात येत असताना प्रत्यक्ष विठ्ठलाने येऊन बैलांना धरले. तेथे चोखोबांचा मोठेपणा लोकांना कळला. येथेही लोकांनी त्यांची क्षमा मागितली.

वरील कथांचा एकत्रित अभ्यास केल्यास असे दिसून येते की, अस्पृश्यांनी विठ्ठल किंवा कोणत्याही देवाच्या मंदिरात जाऊ नये, हा नियम मोडला त्याबद्दल ब्राह्मण लोकांनी छळले, मारले किंवा बैलाच्या सुळाला बांधले असे संदर्भ येतात. उच्चवर्णीय पुजारी अस्पृश्यांना कशाप्रकारे छळत होते त्याचे प्रतिबिंब दिसते. अस्पृश्यांना मंदिर प्रवेशबंदी होती हा धर्मशास्त्राचा नियम होता, हेही समजते. या कथांमधून चोखोबा विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. त्यामुळे प्रत्येकवेळी विठ्ठल त्यांच्या संकटात मदतीला धावून येत होते, असे बहुजनांच्या

(पृष्ठ क्रमांक २१ वर)



# प्राच्यविद्यापंडित शरद पाटील कृत छत्रपती संभाजीराजांच्या कार्याचे अन्वेषण

**डॉ. श्रीमंत कोकाटे**
९४२३३३६४२८

१४ मे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती. यानिमित्तीने छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाचे कॉ. शरद पाटील यांनी केलेले संशोधन व त्याचा अन्वयार्थ यावर प्रकाश टाकणारा लेख.

‘छत्रपती संभाजीराजांसारख्या पराक्रमी, विद्वान आणि सुंदर राजपुत्र मी भारतात इतरत्र पाहिला नाही’, असे समकालीन फ्रेंच पर्यटक अॅबे कॅरे म्हणतो. तो पुढे असेही नमूद करतो की, ‘शिवाजीराजांनी पंधरा वर्षांच्या आपल्या राजपुत्राला दहा हजारांची फौज देऊन गुजरात मोहिमेवर पाठवलेले आहे. ती मोहीम त्यांनी यशस्वी केली. संभाजीराजे आपल्यापेक्षा ज्येष्ठ सैनिक सरदारांना अत्यंत आदराने वागवतात तर समवयस्क सैनिकांना अत्यंत प्रेमाने वागवितात. जखमी सैनिकांना ते अत्यंत ममतेने विचारपूस करतात.’ यातून संभाजीराजांची शौर्यशाली, प्रेमळ, विनयशील प्रतिमा स्पष्ट होते. परंतु उत्तरकालीन बखरकार, कादंबरीकार, नाटककार, चित्रपटवाले, मालिकावाले, कवींनी संभाजीराजे म्हणजे व्यसनाधिन, स्वराज्यद्रोही, स्त्रीअभिलाषा बाळगणारे, उद्धट, उर्मट अशी चुकीची प्रतिमा रेखाटलेली आहे. या कादंबरीकारांच्या तावडीतून संभाजीराजांची सुटका करून त्यांचे वास्तव चरित्र पुढे आणण्याचे महत्त्वाचे कार्य इतिहासार्य वा.सी.बेंद्रे, डॉ. कमल गोखले, प्राच्यविद्यापंडित शरद पाटील, डॉ. जयसिंगराव पवार इत्यादी अभ्यासकांनी केलेले आहे. बेंद्रे, गोखले, पवार यांनी वस्तुनिष्ठ कागदपत्रांच्या आधारे संभाजीराजांचे वास्तववादी चरित्र पुढे आणले. मात्र शरद पाटील यांनी बहुप्रवाही अन्वेषण पद्धती, जाणीव- नेणिवान्वेषी, अब्राह्मणी संशोधन पद्धतीच्याद्वारे जे इतिहास संशोधकांनी मांडले नाहीत, ते संभाजीराजे शरद पाटील यांनी मांडले. जेथे ऐतिहासिक संदर्भसाधने थांबतात तेथे जाणीव नेणिवान्वेषी पद्धती महत्त्वपूर्ण ठरते. या संशोधन पद्धतीचा (Methodology) शोध घेऊन ती विकसित करण्याचे ऐतिहासिक कार्य शरद पाटील यांनी केले.



शदर पाटील हे मुळात वारकरी आणि सत्यशोधक परिवारातून आलेले असल्यामुळे त्यांच्यावर सत्यशोधकी संस्कार बालवयातच झालेले होते. विद्यार्थिदशेत मार्क्सवादी चळवळीत असल्यामुळे मार्क्सवादाच्या भौतिकवादी संशोधनाची शिस्त त्यांच्याकडे होती. परंतु ते बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरवादी असल्यामुळे पारंपरिक मार्क्सवादाला चिकटून बसले नाहीत. भारतीय परिप्रेक्ष्यात मार्क्सवादाला मर्यादा असल्यामुळे त्यांनी मार्क्सवादाला फुले-आंबेडकरी तत्त्वज्ञानाची जोड दिली. तेथेच न थांबता त्यांनी मार्क्सवादाला बुद्धाच्या तत्त्वज्ञानाशी जोडले. यालाच सौत्रांतिक मार्क्सवाद म्हणतात. मुळात ते संस्कृत पंडित होते. त्यांनी पाणिनीचे व्याकरण अभ्यासले असल्यामुळे दडपला गेलेला इतिहास ते शोधू शकले. अनेक ज्ञानशाखांच्या अभ्यासामुळे त्यांच्याकडे बहुप्रवाही अन्वेषण पद्धत होती. जाणीव-नेणिवान्वेषी तर्कशास्त्र ही त्यांनी भारतीय संशोधन क्षेत्राला दिलेली मोठी देणगी आहे. या त्यांच्या ज्ञानाच्या क्षेत्रातील तपश्चर्येला संत साहित्याचे अभ्यासक सदानंद मोरे म्हणतात, ‘‘पाच हजार वर्षातील बहुजनांच्या ज्ञानाचा बॅकलॉग भरून काढणारा विद्वान म्हणजे शरद पाटील’’, तर नामवंत राजनीतिज्ज्ञ प्रा. सुहास पळशीकर म्हणतात, ‘‘स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात स्वतंत्र सैद्धांतिक भूमिका मांडणारा एकमेव माणूस कॉ.शरद पाटील होते.’’ त्यांनी स्वतःचे नवचिंतन, तत्त्वज्ञान उभे केले. बाकीच्या मंडळींनी इतरांच्या सिद्धांतावर चर्चा केली किंवा अनुकरण केले. अशी शरद

पाटील यांची योग्यता आहे. इतिहासाबद्दल त्यांचे असे मत होते की, सत्य इतिहास असत्य इतिहासाबरोबर सावलीसारखा सोबत येत असतो. त्यामुळे सत्य लपविता येते, परंतु नष्ट करता येत नसते. त्यांच्या या चिंतनामुळे, बहुप्रवाही अन्वेषण पद्धतीमुळे छत्रपती संभाजीराजांचा दडपला गेलेला इतिहास ते शोधू शकले.

शरद पाटील म्हणतात, शिवाजी-संभाजी या पितापुत्रात मतभेद नव्हते, होता तो प्रचंड जिव्हाळा. आपल्या पुत्राच्या पराक्रमाचा, शौर्याचा, विद्वतेचा शिवाजी महाराजांना खूप अभिमान होता. आपल्या पुत्राच्या संस्कृत शिक्षणासाठी शिवरायांनी केशवभटची नियुक्ती केली. संभाजीराजांनी संस्कृतवर प्रभुत्व मिळविले. त्यांनी चार ग्रंथ लिहिले. त्यामध्ये 'बुधभूषण' हा संस्कृतभाषेत तर 'नखशीख', 'नायिकाभेद' आणि 'सातसतक' हे तीन हिंदी भाषेत ग्रंथ लिहिले. 'बुधभूषण' या संभाजीराजे रचित ग्रंथाबद्दल शरद पाटील म्हणतात की, संभाजीराजे संस्कृत पंडित होते. त्यांनी 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला, परंतु आज जो भांडारकर संस्थेने प्रकाशित केलेला ग्रंथ आहे. ते ब्राह्मणी चोपडं आहे. त्यात अनेक प्रदोष आहेत. अनेक संस्कृत श्लोक संभाजीराजांच्या नावाने या ग्रंथात खपविण्यात आलेले आहेत, की जे संभाजीराजांच्या कार्याशी आणि विचारांशी सुसंगत नाहीत. मूळ ग्रंथ लपवून किंवा नष्ट करून हे ब्राह्मणी चोपडं पुढे आणलेले आहे, असे शरद पाटील यांचे मत आहे.



संभाजीराजे अत्यंत विद्वान होते. ते संस्कृत पंडित होते. ते सुसंस्कृत होते. असे सुसंस्कृत संभाजी दारुबाज असणे, व्यभिचारी असणे किंवा अर्वाच्य भाषेत बोलणे कदापिही शक्य नाही, असे मत शरद पाटील नोंदतात.

संभाजीराजे जसे संस्कृत विद्वान होते तसेच ते शाक्त होते. शाक्त किंवा शाक्त धर्मदीक्षिताने जातिभेद पाळू नये, असे बातुलतंत्रात म्हटले आहे, असे शरद पाटील म्हणतात, 'शाक्त-संस्कार-संपन्ने जातिभेद न कारयेत।' या सूत्राने संभाजीराजे जगले. शिवाजी-संभाजीने खासगी आणि सार्वजनिक जीवनात कधीही भेदभाव केला नाही, असे शरद पाटील नोंदवितात. संभाजीराजे शाक्त संस्काराने अर्थात अब्राह्मणी विचाराने संस्कारित असल्यामुळे ते पहिल्या ब्राह्मणी राज्याभिषेकाचे विश्लेषण शिवरायांना सांगू शकले, असे शरद पाटील म्हणतात. पहिल्या राज्याभिषेकानंतर (६ जून १६७४) शिवरायांनी दुसरा राज्याभिषेक २४ सप्टेंबर १६७४ रोजी शाक्त पद्धतीने केला. यापाठीमागची प्रेरणा छत्रपती संभाजीराजांची होती, असे शरद पाटील नोंदवितात- ''खजिना रिकामा करणाऱ्या या महिनाभर चाललेल्या (पहिल्या) विधीचे उद्दिष्ट शिवाजीला ब्राह्मण श्रौतस्मार्त पाळणारा राजा बनवणे हे कसे आहे हे संस्कृत पंडित संभाजी पित्याला रोज सांगत गेला. शूद्रातिशूद्रद्वेष्टच्या ब्राह्मणी धर्मातून सुटका जातिधर्म न पाळणाऱ्या शाक्त धर्मस्वीकारातूनच होऊ शकते, हे त्याने शेवटी सांगितले. पुत्राने केलेल्या या प्रबोधनातून शिवाजीने दुसरा शाक्त राज्याभिषेक निश्चळपुरीकडून करवून घेतला.'' छत्रपती संभाजीराजांच्या सल्ल्यानुसार शिवरायांनी दुसरा राजाभिषेक केला असे शरद पाटील सांगतात. यावरून संभाजीराजांची विद्वता, योग्यता आणि पितापुत्रातील घनिष्ट संबंध स्पष्ट होतात. वडिलांवर असणारा संभाजीराजांचा प्रभावदेखील स्पष्ट होतो.

आग्र्याच्या कैदेतून निसटल्यानंतर संभाजीराजांना शिवरायांनी मथुरेत ठेवले असे बहुतके सर्वच मराठी कथाकार, कादंबरीकार सांगतात. परंतु समकालीन साधनांचा हवाला देवून शरद पाटील शिवरायांनी संभाजीला शाक्त पंथीय कवी कलशाकडे वाराणसीला ठेवले असे सांगतात.

दक्षिण दिग्विजयाच्या प्रसंगी संभाजीराजांना रायगडावर धोका असल्यामुळे शिवरायांनी त्यांना

कोकणची जबाबदारी देऊन कोकणात ठेवले. संभाजीराजे दिलेरखानाकडे गेले नसते तर त्याचवेळी ब्राह्मणमंत्र्यांनी त्यांना ठार केले असते. ते दिलेरखानाकडे गेले त्यामुळेच त्यांचा प्राण वाचला असे अन्वेषण शरद पाटील करतात. सनातनी सरंजामदार आणि औरंगजेबाच्या संगनमताने संभाजीराजांची हत्या झाली असे शरद पाटील यांचे मत आहे. संभाजीराजांना पकडून औरंगजेबापुढे उभे केल्यानंतर ते औरंगजेबाला अद्वातद्वा बोलले असे खाफीखान म्हणतो, हे पूर्णतः खोटे आहे, असे शरद पाटील म्हणतात. कारण संभाजीराजे-कविकलश हे सुसंस्कृत होते. ते शिवराळ थराला उतरणे शक्य नव्हते. औरंगजेब हा अत्यंत धर्मांध होता. त्याने अत्यंत निर्दयपणे संभाजीराजांना ठार मारले. संभाजीराजांच्या विद्वतेमुळे त्यांच्या उत्तम कार्यामुळे, स्वच्छ-पारदर्शक राज्यकारभारामुळे मंत्री त्यांचा द्वेष करत होते. शिवरायांनी संभाजीराजांना कोकणात शृंगारपुरात न ठेवता दक्षिण दिग्विजयाला सोबत न्यायला पाहिजे होते, असे मत शरद पाटील व्यक्त करतात. छत्रपती संभाजीराजांनी मरेपर्यंत शाक्त धर्माचा प्रचार केला, त्याबाबत कधीही तडजोड केली नाही. त्यामुळे ते जात्यंतवादी (जातिव्यवस्था नष्ट करणारे) शाक्त हुतात्मा होते, असे शरद पाटील म्हणतात. शरद पाटील यांनी याबाबतचे विश्लेषण 'नामांतर औरंगाबाद आणि पुण्याचे' या पुस्तकात केलेले आहे.

**संदर्भ**

१) शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण, महंमदी की ब्राह्मणी? - शरद पाटील

२) नामांतर औरंगाबाद आणि पुण्याचे-शरद पाटील

**(लेखक इतिहास संशोधक, परिवर्तनवादी कार्यकर्ते वा प्रेरणादायी वक्ते आहेत.)**

●

**(पृष्ठ क्रमांक १८ वरून )**

मनावर जाणीवपूर्वक या कथेतून बिंबवले जात होते. या कथा बहुजन समाजातील लोकांनी प्रसारित केल्या असाव्यात, असे मला वाटते. कारण या कथांमध्ये उच्चवर्णीय ब्राह्मण समाजातील व्यक्ती अस्पृश्य चोखामेळ्याची क्षमा मागताना दिसतात. खरे तर, ही न घडणारी घटना आहे. या संदर्भात मनुस्मृतीचे कायदे फारच कडक आहेत. त्यामुळे क्षमा मागणे हा प्रकार घडला नसावा; पण बडवे किंवा पुजारी चोखोबांना छळत होते, याचा पुरावा चोखोबांच्या गाथेतही दिसतो. ते एका अभंगात लिहितात,

'धाव झाली विठू आता चालू नको मंद
मज मारिती बडवे काहीतरी अपराध
विठोबाचा हार तुझ्या कंठी कैसा आला
शिव्या देऊनी मारा म्हणती देव का बाटला'

यावरून असे दिसते की, तत्कालीन अस्पृश्य समाजाची देवाच्या दारात आणि समाजात वावरताना प्रचंड छळवणूक होत होती. प्रसंगी त्यांना मारहाणसुद्धा केली जात होती, हेच यावरून सिद्ध होते. चोखोबांच्या मृत्यूची ही कथाही अशीच आहे. मंगळवेढा गावचे गावकूस बांधताना कोसळले. त्यामध्ये चोखोबा व इतर मजुरांचा मृत्यू झाला, असे सांगितले जाते.

'कोण तो सोवळा, कोण तो वोवळा, दोन्हीहून आगळा विठू माझा', अशा प्रकारचे विद्रोही प्रश्न विचारून प्रचलित धर्म व्यवस्थेचे स्वार्थी, नकली स्वरूप उघडे करणाऱ्या आणि अस्पृश्यता व शोषणाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या चोखोबांचा अपघात नसून घात आहे, हेही सहज लक्षात येते. एकूण या सर्व कथा कीर्तनकारांनी आपले कीर्तन मनोरंजनात्मक आणि श्रवणीय करण्यासाठी निर्माण केल्या आहेत; पण या कथेमधील अद्‌भुतता, चमत्कारिकपणा, अंधश्रद्धामुळे अनेक संतांच्या चरित्राविषयी वस्तुनिष्ठ माहिती मिळत नाही.

**संदर्भ**

१) कदम स.भा. (संपा), श्री संत चोखामेळा चरित्र व अभंग, (मार्च, १९९८), शब्दालय प्रकाशन, पुणे.

२) जोशी प्र.न., ज्ञानेश्वरी, (१९९२), निर्मल प्रकाशन मुंबई.

३) एलिनार झेलियट, संत चोखामेळा विविध दर्शन १९९५, ग्रंथालय प्रकाशन, पुणे.

**(डॉ.सरगर यांनी 'मराठी वैचारिक साहित्यातील धर्मचिकित्सा' या विषयावर शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली असून सध्या अंनिस मंगळवेढा शाखेचे कार्याध्यक्ष आहेत.)**

●




# तंबाखू सेवन : एक जीवघेणे व्यसन

**डॉ. विवेक निकम । डॉ. अतुल निकम**
९४२१०६०१३६

तंबाखू भारतात उगवणारी एक वनस्पती आहे. या वनस्पतीला संस्कृतमध्ये ताम्रपर्ण, गुच्छफल, क्षारपत्रा, ताम्रकुट व धुम्रपत्र अशी नावे आहेत. शास्त्रीय नाव निकोटिआना टॅबकम (Nicotiana tabacum) असे आहे. हिची पाने वाळवून, कुस्करून त्याला चुना मळतात. याचा वापर लोक खाण्यासाठी करतात. त्याच चुन्यापासून गुटखा बनवतात. वाळलेल्या अखंड पानापासून विडी बनवितात. तंबाखू हा पदार्थ नशादायक आहे. विडी, सिगारेट, सिगार, चिरूट, हुक्का, गुटखा, तपकीर, हिरड्यांना लावण्याची मशेरी, चुन्याबरोबर मिसळून, पानात घालून आणि अशा नानाविध स्वरूपात हा पदार्थ वापरला जातो.

तंबाखू, तमाकू आणि टोबॅको या नावांचे मूळ कॅरेबियन बेटांवर आहे, असे मानले जाते. कोलंबस आणि त्याचे खलाशी इ.स. १४९२ मध्ये कॅरेबियन बेटांवर उतरले. त्या काळात कॅरेबियन स्थानिक लोक तंबाखू वापरताना त्यांना आढळले. ते विस्तवावर तंबाखूची पाने टाकून, त्यांचा धूर नळीतून ते नाकाने ओढत. या नळीला ते 'टाबाको' म्हणत. त्यावरूनच पुढे तंबाखूची सर्व नावे प्रचलित झाली असावीत, असे मानले जाते.

फ्रान्सचा पोर्तुगालमधील राजदूत जाँ निको (Jean Nicot) याने इ.स. १५६० मध्ये एका बेल्जियन व्यापाऱ्याकडून तंबाखू विकत घेतली. हा तंबाखू त्याने फ्रान्सच्या राणीला भेट दिला. वनस्पतींच्या ज्या वंशातून तंबाखू उद्‌भवतो त्याला, याच जाँ निकोच्या स्मरणार्थ, 'निकोटिआना' असे नाव दिले गेले.

त्याच्या दुष्परिणामाबद्दल अनभिज्ञ असल्यामुळे अनेक शतकं तंबाखू सेवन 'आरोग्यदायी' मानलं जायचं. ज्या झाडापासून तंबाखू मिळते त्या निकोटिना वनस्पतीला सोळाव्या शतकात 'the holy herb' म्हणजे पवित्र औषधी वनस्पती किंवा 'God's remedy' देवाचं औषध म्हटलं जायचं. डच वैद्यकीय संशोधक गिल्स एव्हेरार्ड यांना असा विश्वास होता की, निकोटिनामध्ये इतके गुण आहेत की, त्याचा वापर केल्यास लोकांना डॉक्टरांची फारशी गरज पडणार नाही.

१८२८ मध्ये तंबाखूच्या पानातून निकोटिन वेगळं करण्यात यश आलं. त्यानंतर तंबाखूवर वैद्यकीय तज्ज्ञांचा विश्वास कमी होत गेला. दुष्परिणामाबाबत अज्ञान असल्यामुळे प्लेगच्या साथीमध्ये आजारापासून वाचण्यासाठी लोकांना व शाळेतसुद्धा धूम्रपान करण्याचा सल्ला काही ठिकाणी सरकारने दिला होता. १९व्या शतकात मृतदेहांचा वैद्यकीय अभ्यास करणाऱ्या संशोधकांना धूम्रपान करण्यास प्रोत्साहित केलं जायचं. जेणेकरून ते मृतदेहांचा वास सहन करू शकत. त्या काळाची सर्वात मोठी 'कॅमल' सिगारेट कंपनीने आपल्या ॲडमध्ये दावा केला होता की, त्यांची सिगारेट डॉक्टरांच्या आवडीची होती. यावरून कळतं की, तंबाखू ही घातक आहे हे कळायला आपल्याला खूप वेळ लागला. ३५०-४०० वर्षांपूर्वी आपल्या भारतामध्ये तंबाखूचा उल्लेख सापडत नाही. पोर्तुगीज आपल्यासोबत भारतामध्ये तंबाखू घेऊन आले.

तंबाखूमध्ये चार हजार रसायने असतात. यात सर्वात महत्त्वाचे आणि हानिकारक रसायन म्हणजे निकोटिन होय. निकोटिन हे रसायन मानवाला तंबाखूचे सेवन करायला भाग पाडतं. निकोटिन हे मानवाच्या छोट्या मेंदूवर परिणाम करतं. आणि या निकोटिनचं प्रमाण शरीरात जाणं हेच माणसाला तंबाखू सेवन करण्याच्या सवयीत बांधून ठेवतं. माणसाला एकदा का निकोटिनची सवय लागली की तो वारंवार मग ते व्यसन करतो. जर त्याला वेळच्या वेळेवर ते तंबाखू अथवा इतर व्यसन मिळालं नाही तर त्याला मानसिक ताण येतो, मानसिक बेचैनी सुरू होते. जर त्या व्यसनी माणसाच्या शरीरात तेवढ्या प्रमाणात निकोटिन गेलं नाही तर तो चिडचिडपणा करतो, त्याचं डोकं चालत नाही. एकंदरीत तंबाखूमुळे मानसिक, कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक असे दूरगामी परिणाम होतात.

तंबाखूच्या सेवनाने अनेक दुष्परिणाम मानवी शरीरावर होतात. त्यात प्रामुख्याने कॅन्सर म्हणजेच कर्करोग होतो. यात तोंडाचा कर्करोग, ओठाचा, जबड्याच्या, फुफ्फुसाचा, घशाचा, पोटाचा, किडनीचा व मूत्राशयाचा कॅन्सर इत्यादी तंबाखू सेवनाने होतात. भारतात तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कॅन्सर होणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. ९० टक्के फुफ्फुसाचा कॅन्सर आणि इतर कॅन्सर

होण्याचे कारण हे धूम्रपान आहे. तंबाखूमुळे छातीत दुखणे, हृदयविकार झटका येणे, रक्तवाहिन्याचे विकार इत्यादी रोग जडतात. जर धूम्रपान जास्त केले तर टी. बी.सुद्धा होऊ शकतो. जितके जास्त धूम्रपान तेवढा जास्त टी.बी. माणसाला होतो. तंबाखू शरीरातील धमण्याच्या पापुद्र्याला नुकसान पोहचवतात. धूम्रपान किंवा तंबाखू हे अचानक रक्तदाब वाढविते; तसेच हृदयाकडे जाणारा रक्तपुरवठा कमी करते. धूम्रपानामुळे मधुमेह होण्याची शक्यता जास्त बळावते. तसेच रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढत जाते. जी व्यक्ती धूम्रपान करते तिला हृदयरोग व पक्षाघात होण्याचा संभव न धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या तिपटीने जास्त असतो.

तंबाखूच्या सेवनामुळे शारीरिक ताकत कमी होते आणि त्यामुळे सहनशीलता ढासळते. तंबाखू सेवनाने तोंडाची दुर्गंधी, केसांची दुर्गंधी, डोळ्यांखाली काळेपणा येणे, दातांना इजा पोहोचणे हे परिणाम होतात. जर गरोदर स्त्री धूम्रपान करत असेल तर त्यांच्यात गर्भपाताच्या समस्या निर्माण होतात, मूल कमी वजनाचे भरते, बाळाचा अचानक मृत्यूदेखील होऊ शकतो. तंबाखूच्या सेवनाने पुरुषांमध्ये नपुंसकत्व निर्माण होते. जगात दर आठ सेकंदात एका व्यक्तीचा मृत्यू धूम्रपान केल्यामुळे होतो. एवढे दूरगामी दुष्परिणाम करणारे रोग होत असले तरी तंबाखू खाणारे मात्र याला डोळे झाकून सेवन करतात.

धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या सोबत असणाऱ्या व्यक्तीलाही याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. कारण सिगारेट ओढणारी व्यक्ती फक्त ३० टक्के धूर घेतो आणि उरलेला ७० टक्के धूर वातावरणात राहातो आणि इतरांवर परिणाम करतो याला अप्रत्यक्ष सेवन म्हणतात. एखादा व्यक्ती तंबाखू मळत असेल तर बाजूच्याला शिंका येतात, हा तंबाकूचाच परिणाम आहे. याचा परिणाम लगेच समजत नाही तर याचे दूरगामी परिणाम होतात.

गेल्या काही वर्षांत सिगारेटची सवय मोडण्यासाठी ई-सिगारेटचा वापर वाढला आहे. ई-सिगारेट बॅटरी असलेले रिचार्जेबल उपकरण आहे. यामुळे तंबाखूचं थेट सेवन न करता निकोटिनचे झुरके घेता येतात.

व्यसन सोडायचे असेल तर माणूस स्वतःची मदत नक्कीच करू शकतो. व्यसन सोडण्याच्या काही पद्धती आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यासाठी प्रचंड निर्धाराची आवश्यकता असते. तसा तो असेल तरच व्यसन स्वतःहून सोडता येते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यसन सोडण्याचा प्लॅन ठरवावा लागतो. त्याची एक 'क्विट डेट' ठरवावी लागते. म्हणजे अमुक एका दिवशी मी व्यसन पूर्णपणे सोडेल, असा दिवस ठरवावा लागतो आणि त्यानुसार आधीपासून काही गोष्टी अमलात आणाव्या लागतात.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे काही माणसे 'तुझी शपथ, आजपासून मी तंबाखू खाणार नाही', असे म्हणून तंबाखू खाणे एकदम बंद करतात. पण तसे कधीच करू नये. कारण विशेषतः तंबाखू खाणे एकदम बंद केले की, त्याची जोरदार तलफ येऊन माणसे पुन्हा एकदा तंबाखूकडे वळण्याची शक्यता जोरदार असते. त्यामुळे तंबाखू हळूहळू सोडावी. म्हणजे रोज तीन वेळा खात असाल तर सुरुवातीला दोन वेळा... नंतर एक वेळा, असे करावे आणि एक दिवस पुडी फेकून द्यावी.

चौथी महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यसन सोडले तर शारीरिक दुष्परिणाम जाणवू शकतात. जर असा काही त्रास झाला तर त्यावर वैद्यकीय उपचार जरूर करावेत.

या काळात आहार-विहार, व्यायाम अशी दिनचर्या पाळावी. तलफ जावी म्हणून काही जण बाजारात मिळणाऱ्या निकोटिनच्या गोळ्या घेतात किंवा च्युईंगम खातात. असे करताना ते कधी, किती आणि कसे खावे हे जरूर समजावून घ्यावे. अनेक जण ते चुकीच्या पद्धतीने खातात. तसे करू नये. ते नॉर्मली मिळणाऱ्या च्युईंगमसारखे नसते. काही माणसे ते एकदाच चावून चावून खातात आणि फेकून देतात. काही माणसे ते तंबाखूबरोबर खातात. ते चुकीचे आहे. खरे तर तलफ आल्यावर ते च्युईंगम तोंडात टाकायचे.

तलफ फारवेळ राहात नाही. त्यामुळे ते थोडेसे लावायचे आणि गालाच्या बाजूला ठेवून द्यायचे. अशा चुका टाळण्यासाठी त्याबरोबर एक पाम्प्लेट दिलेले असते. ते पूर्णपणे वाचावे. त्यात सगळ्या सूचना दिलेल्या असतात. त्या पाळाव्यात. अन्यथा त्याचा काही उपयोग होत नाही असा त्यांचा गैरसमज होतो आणि माणसे कदाचित पुन्हा एकदा तलफ भागवण्यासाठी व्यसनाकडे वळू शकतात.

तेव्हा व्यसन सोडण्याचा निर्धार करा आणि तो अमलात आणा आणि आपला गाव, तालुका, जिल्हा, राष्ट्र आणि देश व्यसनमुक्त बनवा.

**(डॉ. अतुल निकम हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा मंगळवेढाचे अध्यक्ष आहेत. डॉ.विवेक निकम हे संजीवनी हॉस्पिटल मंगळवेढाचे संचालक आहेत.)**

•



# कार्याध्यक्ष संवाद

**माधव बावगे**
९४०४८७०४३५

प्रिय साथी,

आपण सर्वजण राज्य व जिल्हा पदाधिकारी, जिल्हा प्रेरणा मेळाव्याचे नियोजन करून जिल्हा कार्यकारिणीच्या निवडीची प्रक्रिया या संघटनात्मक कामामध्ये कार्यमग्न आहोत. दुसरीकडे उपक्रमही चालू आहेत. लगेचच राज्य व जिल्हा पातळीवरील कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबिरे आहेत. याची आठवण ठेवून प्रशिक्षणासाठी सहभागी व्हायचे आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेला भारत सरकारच्या रजिस्टार ऑफ न्यूज पेपर्स या कार्यालयाकडून आर.एन.आय.हा नोंदणी क्रमांक मिळाला आहे. या साठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन.

साथी आपल्या विचाराची समविचारी चळवळ तर्कशील सोसायटी, पंजाबचे तीन साथी ॲड. हरिंदर लाली, डॉ. राजा राम, डॉ. राजेश पेगान हे भारतीय संविधान बचावासाठी प्रचार, प्रसार करीत भारत, भूतान, नेपाळ अशी बाईक यात्रा महाराष्ट्रात दि.२९ ते ४ एप्रिल या दरम्यान आली. या यात्रेचे महा. अंनिसच्या वाघाडी शिरपूर शाखेच्या वतीने अभिनव पद्धतीने महाराष्ट्रात गुजरात महाराष्ट्र सीमेवर स्वागत करण्यात आले. ती यात्रा पुढे धुळे, नाशिक, मुंबई, पुणे, कोल्हापूरमार्गे गोव्यामध्ये मार्गस्थ झाली. या सर्व ठिकाणच्या महा.अंनिस पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उत्स्फूर्तपणे स्वागत करून चर्चा घडवून आणल्या आणि ही यात्रा यशस्वी केली.

महा. अंनिसचे राज्य निमंत्रीत हरिदास तम्मेवार यांचा मुलगा गिरीष आणि वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यावाह विलास निंबोरवार यांची कन्या पूजा यांचा विवाह १९ मार्च २०२३ रोजी सत्यशोधकीय पद्धतीने संघटनेच्या सहभागाने संपन्न झाला. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

दि. २८ मार्च ते ५ एप्रिल २०२३ या दरम्यान मी संघटनेचे संघटनात्मक काम, वरील यात्रेचे स्वागत, कार्यकर्ते, शाखा भेटीच्या निमित्ताने धुळे जिल्हा दौऱ्यावर होतो. परतीच्यावेळी धुळे शाखेने त्यांच्या शाखा बैठकीत सतीश उघडे यांचा माझ्या हस्ते सत्कार केला. कारणही तसेच होते. महा.अंनिस ही आंतरजातीय, आंतरधर्मीय सत्यशोधकी विवाहाना प्रोत्साहन देते. एक मुस्लीम मुलगी आणि हिंदू मुलगा यांचा त्यांच्या एकमेकांच्या संमतीने परिचय विवाह झाला होता. जातीधर्माच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी त्यांना दोघांच्याही आई-वडिलांनी स्वीकारले नाहीत. तरीही त्यांचा संसार खूप चांगला चालू होता. त्यांना मुलंही झाली; पण कोरोनानंतर नवरा मुलाचा मृत्यू झाला. त्यावेळी त्याच्या अंत्यविधीचा प्रश्न निर्माण झाला. दोघांच्याही कुटुंबीयांनी प्रेताची विल्हेवाट लावण्यास नकार दिला तेव्हा सतीश उघडे यांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून अंत्यविधीचा सर्व खर्च स्वतः केला. यापुढे अशा व्यक्तींच्या अंत्यविधीचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी महानगरपालिकेला तरतूद करण्याचा आग्रह त्यांनी धरला आहे.

याच कालावधीमध्ये मुंबई येथील एका उच्चशिक्षित महिलेला तिचा उच्चशिक्षित पती व सासरच्या अंधश्रद्धाळू कुटुंबाकडून आणि भोंदूबाबाकडून अतिशय क्रूरपणे झालेला छळ, केवळ दोन्ही घराण्याच्या इज्जतीचा प्रश्न म्हणून, कसा सहन करावा लागला, त्याबद्दलची करून कहाणी वाचायला मिळेलच. केवळ  मॅक्स महाराष्ट्र व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यामुळेच तिच्या तक्रारीची नोंद घेवून तिचे सासरचे लोक व भोंदूबाबाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अशाच पद्धतीने खोपोली येथेही निर्मला मातेच्या वतीने कुंडलिनी जागृत करून कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारखे असाध्य रोग दुरुस्त करण्याचा अवैज्ञानिक दावा करण्याचे प्रकरण रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी लावून धरला आहे. यातूनच कार्यकर्त्यांना एकीकडे प्रबोधन व दुसऱ्या बाजूला संघर्ष या दोनही पातळीवर काम करावे लागते आहे आणि कार्यकर्ते न थकता ते करताहेत, त्यांचा अभिमान वाटतो.

•




# परिवर्तनाचा वाटाड्या - के. डी. खुर्द

**कृष्णात स्वाती**
८६००२३०६६०

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, एक हाडाचे शिक्षक व समाजप्रबोधक के.डी.खुर्द यांचे दि. १९ एप्रिल २०२३ रोजी निधन झाले. त्यांना अंनिसच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कार्यविचारांचा वेध घेणारा लेख.

''कृष्णात हा उतारा वाच आणि कोणतं पुस्तक आहे सांगता येतंय का बघ?'' खुर्द सरांनी कव्हर घातलेली एक पुस्तिका हातात देऊन मला काम दिलं. ही साधारण २००२ सालच्या मे महिन्यातील गोष्ट असेल. तेव्हा मी शिक्षक म्हणून नुकताच नोकरीला लागलो होतो. मी तो उतारा वाचला. त्या उताऱ्यात साधारणतः सण कसे साजरे करावेत हे लिहिले होते. हे कुठेतरी वाचल्यासारखं वाटत होतं; पण नेमकं कुठं हे आठवत नव्हतं. मग सरांनी त्या पुस्तिकेचं कव्हर काढायला सांगितलं. ते इयत्ता सातवीचे नागरिकशास्त्राचे पुस्तक होते. त्यानंतर त्या पुस्तकातील आणखी काही उतारे वाचायला लावून सरांनी थोडा वेळ माझा तास घेतला. ''कृष्णात, तू आता शिक्षक झाला आहेस. शिक्षकांनी शाळेत काय शिकवायचं आहे हे तू आता वाचलंसच. माणसांनी सण कसे साजरे करावेत, त्याने इतर माणसाशी कसे वागावे, याबरोबरच नागरिक म्हणून त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनही जोपासला पाहिजे, हे शिकवणे हे तुझे म्हणजेच शिक्षकांचे काम आहे. तुम्ही शिक्षकांनी हे काम व्यवस्थित केले तर आम्हाला अंधश्रद्धा निर्मूलन समिती म्हणून काम करण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे यापुढे लक्षात ठेव, स्वतःची ओळख सांगताना तू 'अंनिस'चे काम करत नाहीस, तर 'अंनिस' तुझे काम करते असे सांगायचे.'' सरांनी मला स्वतःची आणि 'अंनिस'ची करून दिलेली ही ओळख मला खूपच पटली. खुर्द सर अशा छोट्या छोट्या गोष्टींतून कार्यकर्ता घडवायचे.



खुर्द सरांचा जन्म २ सप्टेंबर १९३४ चा. कोल्हापूर जिल्ह्यातील मलकापूर हे त्यांचे गाव. मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणानंतर ते शिक्षक म्हणून नोकरीला लागले. मलकापूर येथे शिकत आणि शेतकरी कामगार पक्ष आणि गोविंद पानसरे यांच्याशी त्यांचा परिचय झाला. यातून परिवर्तनाच्या विचाराचे बाळकडू त्यांना मिळाले. काही वर्षे शिक्षक म्हणून सेवा बजावल्यानंतर त्यांना शिक्षण विस्तारअधिकारी म्हणून बढती मिळाली. एकदा शिक्षण विस्तारअधिकारी म्हणून कोल्हापूर शहराजवळच्या लक्षतीर्थ वसाहत या उपनगरातील एका शाळेला भेट द्यायला गेले असता त्यांना भारती दाजीराम लोखंडे नावाच्या एक मुलीच्या केसांत जट दिसली. ही १९८२ ची घटना. भारतीच्या केसांतील ती जट पाहून खुर्द सरांच्यामधील समाजशिक्षक जागा झाला. त्यांनी भारतीच्या घरी जाऊन तिच्या पालकांची भेट घेतली. केसांची नीट निगा न ठेवल्यामुळे केसांत जटा होतात. या जटा आताच काढल्या नाहीत तर भविष्यात देवदासी म्हणून तिचे आयुष्य कसे उद्ध्वस्त होईल हे सांगत, ''आम्ही तुमच्या घरातील यल्लम्माच्या परडीसमोर उभे राहून, त्या परडीवर हात ठेवून भारतीच्या जटा काढतो. देवीचा कोप व्हायचा तर तो आमच्यावर होऊ दे. भारतीवर नको'', असे समजावून सांगितले आणि भारतीला आणि तिच्या

कुटुंबाला जटामुक्त केले. हा प्रसंग कार्यकर्त्यांना सांगताना ते नेहमी सांगायचे, ''माणसाच्या केसांतील जटा नंतर काढता येतात. आधी त्यांच्या मनातील अज्ञान आणि अंधश्रद्धेच्या जटा काढाव्या लागतात. अज्ञान आणि अंधश्रद्धेच्या या जटा काढल्या की केसांतील जटा काढणे सोपे जाते.'' गरीब, कष्टकरी, शेतकरी कुटुंबातील आईला कामाला जायची घाई असते त्यामुळे मुलांच्या स्वच्छतेकडे ती फारसे लक्ष देऊ शकत नाही, हे निरीक्षणातून त्यांच्या लक्षात आले होते. मुलींना जटांपासून वाचवण्यासाठी प्राथमिक शाळेतील मुलींचा बॉबकट करण्याचे अभियान राबवले. आपल्या नोकरीच्या काळात खुर्द सरांनी १५० हून अधिक मुलींचे जटा निर्मूलन केले. या कामात ते नेहमी सहकारी शिक्षक, अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचा सहभाग घ्यायचे. परिवर्तनाच्या कामात अधिकाधिक लोकांचा सहभाग घेऊन ते सामूहिक करण्यावर त्यांचा भर असायचा. अधिकाधिक लोकांना सोबत घेऊन काम केल्याने परिवर्तनाचा वेग, समाजात त्याची स्वीकार्हता आणि ते दीर्घकाळ टिकण्याची शक्यता वाढते, यावर त्यांचा विश्वास होता. पुढे १९९० साली शिक्षण विस्तारअधिकारी म्हणून निवृत्त झाल्यावर ते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कामात जोडले गेले.

जटानिर्मूलन अभियानामुळे त्यांच्यात आणखी एक बदल झाल्याचे ते कार्यकर्त्यांशी बोलताना सांगत. जटानिर्मूलन करत असताना चुकीच्या परंपरांची चिकित्सा करण्याची सवय लागली. मग केवळ इतरांची चिकित्सा न करता स्वतःचीही चिकित्सा सुरू झाली. यातून पुढे नवरात्रीमध्ये घरातील देवासमोर तेलाचा दिवा लावण्याच्या पद्धतीची ही चिकित्सा करू लागलो. आजूबाजूच्या अनेक लोकांना खाण्यासाठी तेल मिळत नसताना आपण या नऊ दिवसांत किती तेल वाया घालवतो असा प्रश्न पडू लागला. यातून आधी मोठ्या समईऐवजी छोट्या समईचा वापर, नंतर नऊ दिवस अखंड समई जळती ठेवण्याऐवजी फक्त दिवसा समई लावून ठेवणे, पुढे फक्त पहिला आणि शेवटचा दिवस समई लावणे आणि शेवटी समई लावण्याची गरजच न भासणे असा बदल होत गेला. कार्यकर्ता घडत जाण्याचा हा प्रवास सरांच्या तोंडून ऐकणे म्हणजे स्वतःच्या कृतींकडेही अंतर्मुख होऊन पाहाण्याची संधी असयाची. त्यांच्या बोलण्यातून 'आपण सारे बदलूया!' या वाक्यातील स्वतः बदलणे आणि आपल्या आजूबाजूचा परिवेश बदलणे अशा दोन्ही बाजूंनी बदलणे किती सहज, सोपे आणि सुंदर आहे, हे जाणवायचे.

खुर्द सर हे स्वतःच्या उदाहरणातून कृतिशील शिक्षण देणारे चालते-बोलते विद्यापीठ होते. १९९३-९४ मध्ये गौरी-गणपतीचे 'निर्माल्य दान करा' हा उपक्रम कोल्हापूर येथील पंचगंगातीरावर सुरू झाला. एकाच वेळी खूप मोठ्या प्रमाणात पाण्यात पडणारे हे निर्माल्य पाण्यात कुजून होणारे पाण्याचे प्रदूषण कमी करणे हा या उपक्रमाचा निर्मळ हेतू. या उपक्रमाला प्रतिसादही खूप चांगला मिळाला. १९९६-९७ च्या गणपती उत्सवात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया असे आवाहन करत निर्माल्याबरोबरच 'विसर्जित गणपती दान' करण्याचे आवाहन केले. त्यालाही लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. सर उपक्रमांची नावे निवडतानासुद्धा लोकांच्या भावनांचा विचार करायचे. गणपती दान करा असे न म्हणता 'विसर्जित गणपतीची मूर्ती दान करा' असे आवाहन करायचे. ते करताना गणपतीची मूर्ती एकदा विसर्जित केल्यावर त्यातील देवत्व संपते हे धार्मिक ग्रंथांचे दाखले देऊन लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न करायचे. यासाठी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाची मदत घेऊन शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यायचे. या उपक्रमाला लोकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळतोय हे पाहिल्यावर १९९९, २००० साला पासून शहरातील हिंदुत्ववादी संघटनांनी या उपक्रमाला विरोध करायला सुरुवात केली. हे हिंदुत्ववादी लोक आक्रमकपणे अंनिस कार्यकर्त्यांच्या अंगावर येऊ लागले. यावेळी कॉ. गोविंद पानसरे आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते या उपक्रमाच्या आणि अंनिस कार्यकर्त्यांच्या पाठीशी (खरंतर पुढे) ठामपणे उभे राहिले. पानसरेंच्या उपस्थितीमुळे विसर्जित गणपती मूर्ती दान करायला विरोध करण्यासाठी जमलेला हिंदुत्ववाद्यांचा गटसुद्धा दचकून असायचा. तरीही विसर्जित गणपती मूर्ती दान घ्यायला जमलेल्या कार्यकर्त्यांच्या अंगावर धावून जाणे, त्यांना मारहाण करण्याचे प्रयत्नही झाले. मग इकडूनही काही कार्यकर्ते आक्रमक व्हायचे. पण खुर्द सर त्यांना सबुरीने घेण्याचा सल्ला द्यायचे. फक्त मूर्ती दान घेऊन सर थांबायचे नाहीत. प्रशासन आणि कार्यकर्त्यांच्या मदतीने दान मिळालेल्या मूर्ती कुणाच्याही भावना दुखवणार नाहीत,

अशा रीतीने पिण्याच्या पाण्याचा स्रोत नसणाऱ्या खाणीत या मूर्ती नेऊन सोडायचे. पुढे संघटनेच्या माध्यमातून हा उपक्रम राज्यभर पसरला आणि तो शासनाचा उपक्रम झाला आहे. पुढे कोल्हापुरात विसर्जित गणपती दान देणाऱ्या नागरिकांची संख्या खूप वाढली आणि संघटना म्हणून आपली भूमिका कमी झाली तेव्हा सर आम्हा कार्यकर्त्यांना सांगायचे, आपण सातत्याने, चिकाटीने आणि कृतिशीलपणे केलेले प्रबोधन जसे महत्त्वाचे ठरते; तसेच उपक्रमाच्या सुरुवातीच्या काळात विसर्जित गणपती दान घेण्यासाठी स्वयंसेवक काम करणारे शाळेतील विद्यार्थी आता पालक झाले आहेत. त्यांना शालेय वयातच हा विचार पटवून दिल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात ही चळवळ अधिक रुजली आणि गतिमान झाली.

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात मी अगदी नवखा असताना माझ्या गावात (धामोड, ता. राधानगरी) 'विसर्जित गणपती दान करा' हा उपक्रम राबवण्यासाठी सरांनी मला प्रेरित केले. त्यासाठी गावातील तरुणांना सोबत घेऊन गावाचे सरपंच, ग्रामसेवक, शिक्षक आणि इतर मान्यवर नागरिकांना भेटून आधी वातावरण तयार करण्याचे एक प्रकारचे प्रशिक्षणच दिले. त्यासाठी गावातील वरील मान्यवरांना भेटण्यासाठी ते माझ्यागावी आले. आमच्या या प्रयत्नांमुळे कोणत्याही सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी नसलेल्या आमच्या गावातील २५०, २७५ गणपती मूर्तींपैकी १८५ मूर्ती दान मिळाल्या. या यशाचा आनंद आमच्यापेक्षा खुर्द सरांना अधिक झालेला मी पाहिला आणि अनुभवला आहे. अर्थात, या यशाचे त्यांच्या खुमासदार शैलीतील वर्णन डॉ. दाभोलकरांपर्यंत पोहोचवले. सर स्वत: गावी येऊन गावाचे सरपंच, पोलिस पाटील, या उपक्रमात सहभागी शिक्षक, तरुण कार्यकर्ते यांचे अभिनंदन करून गेले. त्यांच्या पाठोपाठ या सर्वांना डॉ. दाभोलकरांची कौतुकाची आणि अभिनंदनाची पत्रेदेखील आली. चळवळीत अगदी नवख्या असलेल्या तरुण कार्यकर्त्यांवर विश्वास टाकून त्याला पदोपदी मार्गदर्शन करत सर्वांच्या मदतीने संघटनेचा विचार लोकांपर्यंत कसा पोहोचवायचा याचा खुर्द सरांनी कृतिशील वस्तुपाठ पुढे मी संघटनात्मक कामात जोडला गेल्यावर कामी आला. २०१३ मध्ये राज्य कार्यकारिणीमध्ये युवा सहभाग कार्यवाह म्हणून माझी निवड झाल्यावर सर्वात जास्त आनंद खुर्द सरांना झाला होता. राज्याचा युवा सहभाग कार्यवाह काम करत असताना मला जे काही थोडेफार यश आले ते खुर्द सरांनी कार्यकर्ता कसा असावा याचे २००१ साली दिलेल्या कृतिशील प्रशिक्षणामुळेच.

जे विसर्जित गणपती दान उपक्रमाबाबत तेच 'होळी लहान करा, पोळी दान करा' उपक्रमाबाबतही. मोठ्या होळीमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान, रस्त्यांची हानी, नैवेद्य म्हणून आणलेली पोळी होळीत टाकल्यामुळे अन्नाचा होणार अपव्यय हे शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना पटवून देण्याचा प्रयत्न सर करायचे.

गणपतीचा आणि होळीचा सण यायच्या आधी महिनाभर सरांच्या मेंदूतील अलार्म वाजायचा. या अलार्मने सर्व कार्यकर्त्यांना जागे करायचे आणि दरवर्षीच्या नियोजनप्रमाणे स्वत:सोबत सर्वांना कामाला लावायचे. पहिले काम म्हणजे जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेत जाऊन जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर यांचा पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासाठीचा संदेश मिळवणे. तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीबरोबर विसर्जित गणपती दान करा' आणि 'होळी लहान कर, पोळी दान करा' या उपक्रमांत सहभागाचे आवाहन करण्यासाठीचे दोन्ही ठिकाणचे शिक्षण अधिकाऱ्यांचे पत्र मिळवणे. सुरुवातीच्या काळात सर स्वतः हे पत्र घ्यायला सोबत रमेश वडणगेकर आणि अजून एखादा कार्यकर्ता घेऊन दोन्ही कार्यालयांतील तीन मजले चढत जायचे. सरांचा प्रामाणिकपणा आणि तळमळ पाहून समोरचा अधिकारी, कर्मचारी सरांच्यासमोर नतमस्तक व्हायचे. हे दोन्ही सण तोंडावर आले की खुर्द सरांचे कार्यालयात जाणे या कर्मचाऱ्यांच्या एवढे सवयीचे झालेले असायचे की नंतर नंतर हे कर्मचारी सरांचे स्वागत करायचे. सर, तुम्ही या वयात एवढे कष्ट कशाला घेता? एखादा कार्यकर्ता पाठवला तरी आम्ही त्याच्याकडे हे पत्र तयार करून देऊ की म्हणायचे. पण सर ऐकत नसत. ही पत्रे मिळाली की, पुढचा दौरा माध्यमिक मुख्याध्यापक संघाकडे. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, असे शीर्षक लिहिलेले. त्याखाली जिल्हा परिषद माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभाग, महानगरपालिकेचे प्राथमिक शिक्षण मंडळ यांची नावे आणि त्याखाली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अशी नावे आणि शेवटी जिल्ह्यातील सर्व परिवर्तनवादी

संघटनांची नावे लिहिलेला दोन पानी मजकूर तेथे देऊन मुख्याध्यापक संघाचा कागद वापरून त्यांच्याच छापखान्यात १०००० प्रती छापण्याचे विनंतीपत्र द्यायचे. काही दिवसांनी त्या १०००० प्रती ताब्यात घेऊन त्यांचे जिल्ह्यातील १२ तालुकानिहाय प्रत्येक केंद्रासाठी एक गठ्ठा याप्रमाणे संच बनवायचे. ते गठ्ठे पुन्हा जिल्हा परिषदेत शिक्षण विभागाकडे नेऊन द्यायचे. शिक्षण विभागामार्फत ते जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत पोहोचवले जायचे. तसेच कोल्हापूर विभागात येणाऱ्या सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठीसुद्धा त्यांच्या तालुक्याएवढे बंच कोल्हापूर येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात नेऊन द्यायचे. त्यांच्यामार्फत ही पत्रके या चार जिल्ह्यांमध्येही पोहोचायची. या सर्व भव्य उपक्रमासाठी कार्यकर्त्यांचे



मानवी श्रम हाच काय तो खर्च आणि कार्यकर्त्यांचा प्रामाणिकपणा आणि चिकाटी हे प्रायोजक मिळवण्याचे मूल्य! पुढे सरांच्या चालण्यावर थोड्या मर्यादा आल्यावर रमेश आणि मी हे काम करू लागलो.

वर्तमानपत्रातील ‘वाचकांचा पत्रव्यवहार’ सदरातील नियमित पत्रलेखक ही कार्यकर्ता म्हणून सरांची आणखी एक ओळख. कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येक वर्तमानपत्रात प्रत्येक आठवड्याला विविध सामाजिक, राजकीय विषयांवर किमान दोन ते तीन पत्रे यायची. या पत्रांच्या माध्यमातून सरांनी संघटनेचे अधिकृत कार्यकर्ते नसलेल्या अनेक लोकांना संघटनेशी आणि संघटनेच्या विचाराशी जोडून घेतले होते. आम्ही कार्यक्रमाच्या दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी जायचो यांनी ‘अंनिस’चे कार्यकर्ते म्हणून ओळख सांगायचो तेव्हा अनेकवेळा लोक, पेपरमध्ये के. डी. खुर्द पत्र लिहितात त्यांच्याच संघटनेचे कार्यकर्ते ना? असे विचारायचे. एका अर्थाने, खुर्द सर हे कोल्हापूर जिल्ह्याचे नरेंद्र दाभोलकर होते. ते स्वतः पत्र लिहून थांबायचे नाहीत. विविध वर्तमानपत्रांतील आठवड्यातील काही विशेष लेख ते साप्ताहिक बैठकीला घेऊन यायचे. मीटिंगला असणाऱ्या सर्वात नव्या कार्यकर्त्याला ते वाचायला सांगायचे. त्यावर सर्वांची चर्चा घडवून आणायचे. त्याला अनुसरून कार्यकर्त्यांनीही ‘वाचकांचा पत्रव्यवहार’ सदरात पत्रे लिहावी म्हणून आग्रह करायचे. त्यासाठी वेगवेगळे विषय सुचवायचे. कार्यकर्त्यांनी लिहिलेली पत्र वाचून त्यात आवश्यकतेनुसार दुरुस्ती सुचवायचे. लिहिताना भाषा सामान्य माणसाला समजेल अशी सोपी आणि वाक्ये लहान असावीत, याचा आग्रह धरायचे. एखाद्या कार्यकर्त्याचे पत्र छापून आले तर साप्ताहिक मीटिंगमध्ये ते पत्र उत्साहाने स्वत: वाचून दाखवायचे. त्याचे तोंडभरून कौतुक करायचे. भाषा आणि आशय अधिक समृद्ध व्हावा यासाठी अवांतर वाचनाचा आग्रह धरायचे. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे उमेश सूर्यवंशी, रमेश वडणगेकर आणि मी ‘वाचकांचा पत्रव्यवहार’ सदरात पत्र लिहू लागलो. आमच्या लेखनाला आज जी काही थोडीफार मान्यता मिळते आहे त्याचे मूळ खुर्द सरांनी केलेल्या या संस्कारात आहे.

कोल्हापूर शाखेच्या कार्यकर्त्यांत नेहमीच युवा आणि महिला वर्गाचा उल्लेखनीय सहभाग राहिला आहे. खुर्द सर साप्ताहिक मीटिंगला आलेल्या प्रत्येक नव्या कार्यकर्त्याचे आनंदाने स्वागत करत. (खरंतर हे प्रत्येक शाखेतच होत असते) पुढे या नवीन कार्यकर्त्यावर विश्वास टाकून त्याच्यावर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या टाकत. ती पूर्ण करताना केलेल्या कामाचे सार्वजनिकपणे कौतुक करत आणि एखादी चूक झाली तर समजावून घेऊन खाजगीमध्ये सूचना देत. एखाद्यावेळी सरांनी आम्हाला काही वाचायला सांगितले. पुढच्या साप्ताहिक मीटिंगपर्यंत ते वाचून पूर्ण झाले नाही त्यासाठी आम्ही ‘वेळ मिळाला नाही’ म्हणून त्याच्या समर्थनार्थ काहीबाही कारणे देत असू. तेव्हा सर म्हणायचे, ‘‘आपल्याला वेळ मिळत नाही असे वाटते तेव्हा आपण दाभोलकर आणि पानसरे यांचेकडे पाहायचे. एक दिवसात ते किती काम करतात हे लक्षात घ्यायचे. आणि मग स्वतःलाच प्रश्न

**(पृष्ठ क्रमांक ३१ वर)**



# द लास्ट गर्ल : आयसिसच्या बंदिवासातून सुटलेल्या तरुणीची संघर्षकथा

**यशवंती शिंदे,** कोल्हापूर
८८३०१७९१५७

दहशतवादाचे अमानुष, क्रूर, रूप, त्याने घडविलेले नरसंहार, 'सेक्स गुलाम' म्हणून स्त्रियांचे केलेले अमानुष शोषण, मूलतत्त्ववाद्यांची रक्तपिपासूवृत्ती, त्यांच्या तावडीतून सुटकेचा जीवघेणा थरार यांचे हादरवून टाकणारे, भयावह वास्तव चित्रित करणारे आत्मकथन म्हणजे 'द लास्ट गर्ल'. नादिया मुरादचे हे पुस्तक प्रत्येकाला अंतर्मुख, अस्वस्थ करून कट्टरतावादाविरोधात लढण्याची प्रेरणा देते. आतंकवादविरोधी दिनानिमित्त (दि. २१ मे) या आत्मकथेचा परिचय.

२०१४च्या सुरुवातीला इस्लामिक स्टेटच्या (आयसिस) एका दहशतवादी गटाने इराकमधील कोचो या खेडेगावातील यजिदी या अल्पसंख्य समुदायावर हल्ला केला. यामध्ये सामूहिक हत्या, लैंगिक हिंसा, गुलामगिरी आणि इतर अत्याचारांचा समावेश होता. या सर्व हल्ल्याला आणि यामध्ये झालेल्या हत्यांना युनायटेड नेशन्सनी वंशहत्या म्हणून मान्यता दिली आहे. युनायटेड नेशन्समध्ये यजिदींवरील अत्याचारांना वाचा फोडणारी नादिया मुराद ही तरुणी. तिने इस्लामिक स्टेटच्या अत्याचाराचे अनुभवलेले भयानक वास्तव 'द लास्ट गर्ल' या आत्मकथनामध्ये मांडलेले आहेत. मूळ इंग्रजीमध्ये असणाऱ्या 'द लास्ट गर्ल' या पुस्तकाचा सुप्रिया वकील यांनी मराठीमध्ये अनुवाद केला असून मेहता पब्लिशिंग हाऊसने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकाचे एकूण तीन भाग आहेत. यातील पहिल्या भागात दक्षिण इराकमधील कोचो या खेड्यातील लोकजीवन, त्यांच्या स्थानिक परंपरा, धार्मिक विधी यांचे वर्णन येते. दुसऱ्या भागात गावातील यजिदी मुलींना पकडून सेक्स गुलाम बनवून त्यांच्यावरील अत्याचारांचे आणि तिसऱ्या भागात नादियाने आयसिसच्या तावडीतून स्वतःची सुटका कशी करून घेतली याचे हृदयद्रावक चित्रण येते.


'द लास्ट गर्ल' या पुस्तकातील नादिया ही एक अत्यंत धाडसी यजिदी तरुणी आहे. २०१४मध्ये जेव्हा इराकमधील तिच्या कोचो या खेडेगावामध्ये आयसिस या दहशतवादी संघटनेने हा हल्ला केला, तेव्हा ती केवळ २१ वर्षांची होती. तिची आई, सहा भाऊ आणि गावातील सर्व पुरुष व वयोवृद्ध स्त्रियांना त्यांनी एकाच वेळी गोळ्या घालून मारले. तिच्यासह गावातील सर्व स्त्रिया, लहान मुली, कोवळी मुले यांना पकडून बंधक बनवले. तरुण स्त्रिया आणि मुलींना सेक्स गुलाम म्हणून विकले गेले. आयसिसच्या अत्याचारांना विरोध आणि त्यांच्या तावडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सोसावे लागलेले सामूहिक बलात्कार, अनन्वित छळ, शोषण या सर्व अत्याचारांनी पुस्तकाचे पान अन् पान व्यापले आहे. नादिया म्हणते, ''आयसिससोबतचा प्रत्येक क्षण म्हणजे हळूहळू येणारं, यातनादायी मरण होतं... शरीराचंही आणि मनाचंही...'' यावरून या मुलींना आयसिसच्या तावडीत असताना काय काय सोसावे लागले असेल याची आपण कल्पना करू शकतो.

'सेक्स गुलाम' म्हणून विकले जात असताना अंगावर काटा उभा करणारे वर्णन नादियाने केले आहे. ती लिहिते, ''मी मनोमन प्रार्थना करत होते की, मला एकाच माणसाने गुलाम बनवावं.'' आपलं विकलं जाणं हे निश्चित आहे. सेक्स गुलाम असणं म्हणजे जो माणूस विकत घेतो त्याची वस्तू बनणं आणि त्याला हवं तसं, हवं तेव्हा त्याने सेक्ससाठी वापरणं. हे माहीत असूनसुद्धा त्यातल्या त्यात कमी त्रासाची अवस्था म्हणजे एकाच माणसाची गुलाम होणे. हे चित्रण वाचले की नादियाची असहाय आणि लाचार अवस्था आपल्या नजरेसमोर येते. माणूसपण आणि सन्मान हिरावून घेतला जाणं यासारखी भयंकर गोष्ट दुसरी कोणती असू शकेल?

एक दहशतवादी नादियाला सेक्स गुलाम म्हणून विकत घेतो. त्याच्या अमानुष छळाला कंटाळून नादिया पळून जाण्याचा प्रयत्न करते. तिने पळून जाण्याचा प्रयत्न केल्याबद्दल तिला अमानुष मारहाण करून त्याच्या तीन पहारेकऱ्यांना तिच्यावर सामूहिक बलात्कार करायला लावतो. अशा प्रकारची शिक्षा म्हणजे पुन्हा पळून जाण्याचा प्रयत्न करू नये, यासाठीचा इशाराच! तिने पळून जाण्याचा प्रयत्न केल्यामुळे तिला दुसऱ्या एका दहशतवाद्याला विकले

गेले आणि त्याच्याकडे असतानाच ती आयसिसच्या तावडीतून पळून जाण्यात यशस्वी झाली.

दहशतवाद्याच्या तावडीतून पळाल्यानंतर तिच्या मनाची अवस्था तिने मांडली आहे. ती लिहिते, ''मी वाट फुटेल तिकडे चालत होते. कुणी आपल्याला पाहू नये याचा प्रयत्न करीत होते. कुठे जातेय, कोणत्या दिशेला जातेय, कोणत्या भागात आहे हे काहीही माहीत नव्हते. फक्त मी त्यांच्या तावडीतून सुटले, एवढेच मला माहीत होते. माझी छाती इतकी जोरात धडधडत होती की, मला भीती वाटत होती, माझ्या जवळून जाणाऱ्या लोकांना ते ऐकू येईल आणि मी कोण आहे हे त्यांना कळेल.'' आपण पुन्हा पकडले जाण्याची प्रचंड भीती तिला वाटत होती. दहशत काय असते आणि इतका छळ सहन केल्यानंतरही आपण सापडलो तर आणखी काय काय आपल्या वाट्याला येऊ शकतं, याबद्दलची तिची भयावह मनोवस्था व्यक्त होते.




ती पळाली होती, परंतु आता पेच असा होता की, मदत कुणाकडे मागायची? ज्याला मदत मागायची तो आयसिसला सामील असला तर...? त्याने सगळे बोलणे ऐकून घेऊन पुन्हा आयसिसकडे सुपूर्द केले तर...? तरीदेखील तिने प्रचंड घाबरत अंधारात एका दारावर थाप दिली. दार उघडल्यानंतर तिने त्या घरातल्यांना तिची सगळी हकीकत सांगितली आणि आपल्याला त्यांच्या तावडीतून वाचवावे अशी विनंती केली. तिच्या सुदैवाने ते लोक चांगले निघाले. त्यांनी तिला आश्वस्त केलं की, ''तू या ठिकाणी एकदम सुरक्षित आहेस. तुला तुझ्या लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही शक्य ती मदत करू.''

त्या कुटुंबामधीलच नसिर नावाच्या एक तरुण मुलाने तिला कुर्दिस्तानमधील यजिदींच्या निर्वासित छावण्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी स्वतःचा जीव धोक्यात घालून पार पाडली. आयसिसच्या तपासणी नाक्यांवरून सुटकेचा प्रवास एखाद्या भयपटापेक्षाही अधिक थरारक आणि भीतिदायक आहे. मोसूलमधून बाहेर पडत असताना पहिला तपासणी नाका आल्यानंतर झालेली नादियाची अवस्था तिने वर्णन केली आहे, ''रांगेत आमच्या पुढे थोड्याच गाड्या असल्यामुळे आम्ही पहारेकऱ्याजवळ लगेचच पोहोचलो. मी अक्षरशः थरथरू लागले होते. मी जितका शांत राहण्याचा प्रयत्न करीन, तितकं माझं अंग जास्त कापत होतं... त्यामुळं आपण नक्की सापडणार असं मला वाटत होतं. टॅक्सीचा वेग कमी झाला तेव्हा मी गाडीच्या दाराच्या हँडलवर एक हात ठेवला. गरज पडलीच तर उडी मारण्याच्या तयारीनं!'' नादियाने नकाब घातलेला असल्यामुळे तिची अवस्था कुणाच्या लक्षात येत नव्हती. आपण सापडले जाऊ या भीतीने ती घामाने चिंब भिजली होती आणि भीतीने थरथर कापत होती. पुढे येणाऱ्या तपासणी नाक्यांवरील चौकशांदरम्यान तिला थोडा धीर येत गेला. एकेक करत त्यांनी सर्व तपासणीनाके पार केले व ती यजिदींच्या निर्वासित छावण्यांमध्ये पोहोचली.

आयसिसच्या तावडीतून नादिया सुटली होती. परंतु तिचे मनोबल खचले होते. आपण आयसिसपासून सुटलो, पण पुढे काय? आपले भाऊबंद नाहीत, कोणी नातलग नाहीत, घर नाही, जमीन नाही, अन्नासाठी सर्वस्वी इतरांवर अवलंबून! अशा अवस्थेत आपण कशासाठी जगायचे? यांसारखे अनेक प्रश्न तिला पडायचे.

नादियाने सुटकेनंतर आयसिसच्या दहशतवाद्यांच्या तावडीतून इतर मुलींना सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. यजिदी मुलींना सोडविण्यासाठी काय काय प्रयत्न करावे लागले हे सांगताना नादियाने एक उदाहरण दिले आहे. नादियाची भावजय जिलन जवळजवळ दोन वर्षे आयसिसच्या बंदिवासात होती. तिला सोडविण्यासाठी तिच्या भावाने एक भयंकर योजना आखली. ज्या दहशतवाद्याच्या घरी जिलन होती, त्याच्या पत्नीचीच मदत घेण्याचे ठरले. त्या दहशतवाद्याच्या पत्नीला नवऱ्याचे यजिदी मुलींवरील अत्याचार पाहून उबग आला होता. या मुलींची सुटका करायची असेल तर त्याला ठार मारणे हाच पर्याय आहे, हे तिच्या लक्षात आले. त्यानुसार एका कमांडरच्या साह्याने तिच्या नवऱ्याच्या गाडीवर हवाई हल्ला करण्यात आला आणि त्यात तिचा नवरा ठार झाला. एखाद्या दहशतवाद्याची पत्नीच आपला पती अत्यंत अमानुष अत्याचार करत आहे, हे पाहून त्याला ठार मारण्यास तयार होते. यावरून आपण कल्पना करू शकतो की, आयसिस किती भयंकर आहेत.

नादिया आयसिसच्या तावडीत सापडलेल्या मुलींना वाचविण्यासाठी आजही प्रयत्न करीत आहे. 'यजदा' या यजिदी समुदायाच्या पीडित लोकांसाठी काम करणाऱ्या संस्थेबरोबर ती जोडली गेली आहे. तिने केलेल्या भाषणांमुळे प्रभावित होऊन संयुक्त राष्ट्रसंघाने यजिदींच्या बाबतीत आयसिसने जे केलं, ती वंशहत्या असल्याचं जाहीररीत्या मान्य केले आहे. नादिया तिने सहन केलेले अत्याचार, हालअपेष्टा यांच्याबद्दल भाषणे देते. ती म्हणते, ''माझी कहाणी, जी मी प्रामाणिकपणे व वस्तुनिष्ठपणे सांगते, हे माझं दहशतवादाविरुद्धचं अमोघ अस्त्र आहे आणि मी ते दहशतवाद्यांना न्यायव्यवस्थेसमोर उभे करेपर्यंत वापरणार आहे.'' अशाच तिने केलेल्या एका भाषणात ती म्हणते, ''प्रत्येक यजिदी माणसाची आयसिसला वंशहत्येबद्दल शिक्षा व्हायला हवी अशीच इच्छा आहे. मला माझ्यावर बलात्कार करणाऱ्या माणसांच्या नजरेला नजर द्यायची आहे आणि त्यांना न्यायव्यवस्थेसमोर उभं केलेलं पाहायचं आहे. आणि बाकी कशाहीपेक्षा, कुणाचीही कहाणी माझ्यासारखी असू नये, अशी माझी इच्छा आहे. अशी कहाणी असलेली मी जगातली शेवटचीच मुलगी असावे... द लास्ट गर्ल...!''

२०१४-१५ मध्ये हे सर्व इराकमध्ये घडत असताना जगातल्या इतर भागांत राहणारे आपण सर्व या गोष्टींची कल्पना तरी करू शकत होतो का? जगभरात कितीही सुधारणा झाल्या असल्या, तरी एक माणूस दुसऱ्या एखाद्या माणसाशी तो केवळ आपल्याहून इतर धर्माचा आहे म्हणून इतका क्रूरपणे कसा काय वागू शकतो? आज जगभर मूलतत्त्ववाद मूळ धरत आहे. आपला धर्म श्रेष्ठ, आपण म्हणू तेच बरोबर आणि पर्यायाने इतर धर्मीयांनी आपल्या अंकित राहिले पाहिजे अशी वृत्ती यातून तयार होत आहे. या पाशवी अभिलाषेतून अल्पसंख्य धार्मिक समूहांना चिरडून टाकून त्यांचा वंशच नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुळात कुठलाही धर्म माणसाला मारण्याची अथवा त्याला संपवून टाकण्याची शिकवण कधीच देत नाही. मग अशा माथेफिरू संघटना धर्माच्या नावाखाली वंशहत्येसारखा निर्घृण प्रकार कृतीत कसा काय आणत असतील, असा प्रश्न पडल्यावाचून राहात नाही. नादियाच्या उद्ध्वस्ततेची ही कहाणी आपले अनुभव निडरपणे तर सांगतेच, पण इतरांचे दुःखभोग मुक्याने बघत राहणाऱ्या जगाच्या पाठीवरील कोट्यवधी लोकांच्या संवेदनशीलतेवर व कृतिशून्यतेवर प्रश्न उपस्थित करून आपल्या सर्वांच्या विचारांना आणि भावनांना साद घालते.

**(लेखिका अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कोल्हापूर शहर कार्याध्यक्षा आहेत.)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक २८ वरून )**

विचारायचा - या दोघांना २५ तासांचा दिवस आणि आपल्याला २३ तासांचा दिवस असे काही आहे काय? तसे असेल तर ठीक आहे आणि तसे नसेल तर आपण स्वतःशी आणि इतरांशी पण खोटे बोलतोय हे समजून जायचे.'' सरांच्या या बोलण्यानंतर त्याचा प्रतिवाद करायला आमच्याकडे काहीही नसायचे. एका बाजूला आपल्या कार्यकर्त्यांवर निरातिशय प्रेम आणि दुसऱ्या बाजूला तो अधिकाधिक निर्दोष व्हावा यासाठीची तळमळ, यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याला त्यांच्यामध्ये एक प्रेमळ पिता दिसायचा! खुर्द सरांचा स्वभाव खूप मृदू होता. अगदी 'अंनिस'च्या कार्यकर्त्यांचा जसा असायला हवा तसा! २०११ मध्ये संघटनेच्या वतीने कार्यकर्त्यांसाठी 'जीवन गौरव पुरस्कार' देण्याचा विचार पुढे आला तेव्हा पहिले नाव म्हणून खुर्द सरांचे नाव पुढे आले. यातच खूप काही आले.

वयोमानानुसार हालचालींवर मर्यादा येऊन सरांचा प्रत्यक्ष कामातील सहभाग कमी झाला तेव्हा घरी जाऊन आम्ही त्यांना भेटायचो. भूतकाळातील कामाची चर्चा करायचो तेव्हा 'विसर्जित गणपती दान करा' आणि 'होळी लहान करा, पोळी दान करा' या सरांनी महाराष्ट्राला दिलेल्या उपक्रमापेक्षा डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. गोविंद पानसरे यांची भेट घडवून आणण्याची ....... पुढे त्यांचे नाते वृद्धिंगत करण्यासाठी निमित्त बनण्याची संधी मिळाल्याबद्दल सरांना अधिक समाधान वाटायचे.

आज खुर्द सर आपल्यात नाहीत. पण त्यांनी संघटना आणि विचार म्हणून आपल्याला दिलेले 'विसर्जित गणपती दान करा' आणि 'होळी लहान करा, पोळी दान करा' हे उपक्रम आणि त्यांनी घडवलेले कार्यकर्ते, या कार्यकर्त्यांनी घडवलेले कार्यकर्ते खुर्द सरांची आठवण म्हणून सतत आपल्यासोबत असतील.

●



# संघटना बांधणी

**विनायक सावळे, शहादा**
९४०३२५९२२६

संघटन, संघटनेचे उद्देश, विचारधारा, कार्यकर्ते, नेतृत्व, कार्यपद्धती, संघटनेच्या यशापयशाचे घटक, उपक्रम अशा सर्व पैलूंची सूक्ष्म, चिकित्सक व मूलगामी मांडणी करीत मराठीमध्ये पहिल्यांदाच 'संघटनाशास्त्र' सिद्ध करणारी व स्वानुभव आणि चिंतनातून साकारलेली विशेष लेखमाला.

एका विशिष्ट विचारांच्या प्रस्थापनेसाठी किंवा एखाद्या ध्येयप्राप्तीसाठी काही लोक एकत्र येतात. एकसंघपणे एकाच दिशेने प्रयत्न करू लागतात तेव्हा या गटाला संघटना असे म्हटले जाते.

म्हणजे संघटनेचे प्रामुख्याने तीन भाग झाले. ध्येयाची प्राप्ती, त्यासाठी लोकांचं एकत्र येणं आणि एकाच दिशेने, एकसंघपणे प्रत्यक्ष काम करणं.

अनेक संघटना निर्माण होतात, काही टिकतात, वाढतात, विस्तारतात, काही प्रभावहीन होतात, काही फुटतात तर काही नष्ट होतात. हे सगळे आपण आपल्या अवतीभवती बघत असतो. वर्षानुवर्षे ध्येयप्राप्तीसाठी एकसंघपणे लढणाऱ्या संघटना तशा कमीच असतात. आपल्याच कार्यकर्त्यांच्या गुणदोषांचे परिणाम संघटना भोगत असतात. जेथे माणसं आली, तिथे त्यांचे राग, लोभ, महत्त्वाकांक्षा, हेवेदावे, द्वेष, मत्सर, स्पर्धा, असुया असे दोषही आले. त्यासोबत त्याग, समर्पण, झीज सोसण्याची तयारी, मान, अपमान याच्या पलीकडे जाण्याची भूमिका, प्रेम, करुणाभाव हेदेखील आले.

अशा भावभावनांच्या मिश्रणात संघटना उभी करणे हे एक आव्हान असते. संघटना उभी करणे हे जसे शास्त्र आहे, त्यापेक्षा अधिक ते एक कौशल्य आहे. आणि हे कौशल्य नीट समजून घेतल्यास, स्वतःला घडवण्याची तयारी ठेवल्यास मिळवता येऊ शकते. त्यासाठी संघटना उभी करणाऱ्या नेत्याला आणि संघटना चालू इच्छिणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांना एका बाजूला हे शास्त्र समजून घेणे आवश्यक आहे आणि दुसऱ्या बाजूला त्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये शिकून घेण्याचीसुद्धा आवश्यकता आहे.

तेव्हा पहिल्यांदा संघटना नेमकी चालते कशी हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**संघटना कशी चालते ?**

याचा एक नेमकं उत्तर आहे. विचाराने प्रेरित होऊन सातत्याने कृतिशील असलेल्या कार्यकर्त्यांच्या बळावर संघटना चालते. याचा अर्थ, विचार आणि कृती या दोन्ही पातळीवर सजग असलेले कार्यकर्ते कुठल्याही संघटनेचे आधार, ऊर्जा, बळ असं सर्व काही असतात. विचार आणि कृती दोन्ही गोष्टी तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. विचार नसताना कृती करण्याचा प्रयत्न केला तर ती चुकीची, अपुरी, दिशाहीन, अर्थहीन ठरण्याची शक्यता असते आणि कृती नसताना केवळ विचार मांडत राहिलो तर ते एक अनुत्पादित कार्य ठरते. ज्याचा संघटनेला फार उपयोग नसतो म्हणून कोणत्याही संघटनेसाठी विचार आणि कृती दोन्ही पातळीवर कृतिशील असणारी माणसं फार महत्त्वाची असतात.

शाखा, जिल्हा, राज्य चालवणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांवर म्हणून ही जबाबदारी असते की, आपल्या कार्यकर्त्यांना संघटनेचा विचार नीट समजावून देणे, त्यासाठी सातत्याने त्यांची प्रशिक्षणं घेत राहाणे, नियमितपणे वैचारिक साहित्याची निर्मिती करणे, वैचारिक चर्चा घडतील याची तजवीज करणे आणि दुसऱ्या बाजूला आपल्या प्रतिभा वापरून सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रमाची आखणी करणे, त्या उपक्रमात कार्यकर्त्यांचा सहभाग मिळवणे, त्यांना रोल देणे, भूमिका देणे, हे नेतृत्व करणाऱ्या माणसाला निराश न होता, सातत्याने करीत राहावे लागते.

काही वेळा असे होऊ शकते, विचार करणारी माणसे आहेत; पण प्रत्यक्ष काम करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही, हे वास्तवदेखील काहींच्या बाबतीत समजून घ्यायला हवे. त्यांचाही योग्य पद्धतीने उपयोग संघटनेसाठी करता यायला हवा; पण संघटनेसाठी वेळ देणारा कार्यकर्ता हा

अधिक महत्त्वाचा आहे. कारण प्रयत्न केल्यावर संघटनेसाठी पैसा मिळेल, ज्ञान मिळेल; पण वेळ मिळवणे फार कठीण असते. अशाप्रकारे संघटनेसाठी वैचारिक आणि वेळेची गुंतवणूक करणारे कार्यकर्ते हे संघटना चालवीत असतात. ज्या संघटनेत अशा कार्यकर्त्यांची मांदियाळी आहे, त्या संघटनेचे भविष्य उज्वल आहे. अशा समर्पित कार्यकर्त्यांची नेमकी संकल्पना काय हे आता समजून घेऊया.

**समर्पित कार्यकर्ता कोण असतो ?**

लक्षात घ्या, संघटना ही कार्यकर्त्यांच्या बळावर चालते. कोणत्या कार्यकर्त्यांच्या बळावर चालते? वर म्हटल्याप्रमाणे विचारांनी प्रेरित होऊन सातत्याने कृतिशील असलेल्या कार्यकर्त्यांच्या बळावर संघटना चालते. मग असे कार्यकर्ते संघटनेत ओळखायचे कसे? यांना ओळखण्याचे काही परिमाण आहे का? याचे उत्तर आहे. होय, अशा समर्पित कार्यकर्त्यांना ओळखण्याचे परिमाण आहे.

ते परिमाण आपण समजून घेऊया आणि त्या परिमाणात आपण बसतो का? हे स्वतःलाच विचारूया.

साथी हो, दोन शब्द लक्षात घ्या. एक म्हणजे 'धारणा', आणि दुसरा शब्द 'सातत्य'. धारणा शब्दाला तुम्ही 'जीवनधारणा' देखील म्हणू शकतात. हे दोन्ही शब्द म्हणजे समर्पित कार्यकर्त्यांची परिमाणे आहेत.

धारणा म्हणजेच जीवनधारणा. या शब्दात तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो. एक, विचारांची बांधिलकी, दोन, त्या बांधिलकीपोटी स्वतः कृतीत तो विचार आणणे आणि तीन, तो विचार समाजात प्रस्थापित करण्यासाठी सतत कृतिशील राहाणे. केवळ तो विचार मांडून चालत नाही, तर तो विचार स्वतःच्या जीवनात, आचरणात असतो आणि तुमचं मन त्या विचाराला समाजात प्रस्थापित करण्यासाठी तुम्हाला आतून सतत धक्का देण्याचं काम करतं. म्हणजे कृती करण्यासाठी तुम्हाला बाहेरच्या कोणत्याही दबावाची, प्रभावाची, प्रेरणेची गरज नसते. तुम्ही स्वयंप्रेरणेने कृतिशील राहातात.

आणि दुसरा मुद्दा आहे सातत्य. तुम्ही केवळ तुमच्या हौसेखातर काही दिवस काम करत नाहीत किंवा काही महिने काम करत नाहीत किंवा केवळ काही वर्षेच काम करत नाही, तर तुम्ही ते काम आपले आयुष्यभर, सातत्याने करीत राहातात. याला म्हणतात ते काम आयुष्याचा भाग म्हणून करणे.

जेव्हा एखाद्या संघटनेला, जीवनधारणा आणि सातत्य ही दोन परिमाणे असलेले कार्यकर्ते मिळतात तेव्हा त्या संघटनेचा भविष्यकाळ उज्वल असतो. ती संघटना मजबूत संघटना असते. तिला संपण्याचे, थांबण्याचे, नष्ट होण्याचे धोके नसतात.

तेव्हा संघटनेमध्ये जीवनधारणा आणि सातत्य असलेले कार्यकर्ते कसे राहातील, असतील तर ते कसे ओळखायचे आणि त्यांची ओळख पटली तर ते तुमच्या संघटनेची संपत्ती आहेत, हे लक्षात ठेवा.

**(लेखक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सरचिटणीस आहेत.)**

•

**वाचकांच्या प्रतिक्रिया**

गणित प्रेमी आणि इतरही लेख अतिशय सुंदर आहेत. मी अंकाचे नियमित वाचन करत असतो. अंकातील सदरे, विषय, लेखन व मांडणी चांगली आहे.

**मनोज कवठे** (गडचिरोली)

एप्रिलच्या अंकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. तृप्ती थोरात यांनी लिहिलेला लेख मला खूप आवडला. पत्रिकेतून दर्जेदार लेखन व अंनिसच्या विविध उपक्रमांची माहिती प्रसिद्ध केल्याबद्दल संपादकांचे अभिनंदन.

**बाळासाहेब घस्ते** (पिंपरी चिंचवड)



अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कोल्हापूर
जिल्हा युवा कार्यकर्ते,
मुरगूड शाखा युवा कार्यवाह व प्रयोगशील शिक्षक
**श्री. विकास सावंत** (वय २७)
यांचे दि. २५ एप्रिल २०२३ रोजी हृदयविकाराच्या
धक्याने आकस्मिक निधन झाले.
त्यांना अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली



# तर्कशील सोसायटीच्या कार्यकर्त्यांची महाराष्ट्र यात्रा

**प्रा. डॉ. सुदेश घोडेराव**
९४२२२५७६५४

तर्कशील सोसायटी पंजाब-हरियाणाचे कार्यकर्ते भारत, भूतान, नेपाळ या तीन देशांची यात्रा दुचाकीवरून करीत संविधानिक मूल्यांचा प्रचार व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करीत आहेत. या यात्रेचे महाराष्ट्रातील संयोजन अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले. त्याचा हा वृत्तांत.

भारत, भूतान आणि नेपाळ अशा तीन देशांमध्ये दुचाकीवरून यात्रेचे नियोजन प्रथमच करण्यात आले आहे. तर्कशील सोसायटी पंजाबचे ॲड. हरिंदर लाली, तर्कशील सोसायटी भारतचे डॉ. राजा राम आणि तर्कशील सोसायटी हरियाणाचे डॉ. राजेश पेगन यांनी दिनांक १९ मार्च २०२३ पासून सुनाम उधमसिंहवाला, पंजाब येथून यात्रा सुरू केली आहे. या यात्रेचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये संविधानात सांगितलेल्या कर्तव्यांची जाणीव करून देणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसार करणे हा होय. दुसरा उद्देश, दुचाकीवरून तीनही देशांत सलग यात्रा करता येते आणि तिसरा उद्देश तिन्ही देशांमधील विविध संस्कृती समजावून घेणे हा आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या यात्रेचे स्वागत, कार्यकर्त्यांसह बैठका आणि जाहीर सभा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले.



दि.२९ मार्च रोजी संध्याकाळी यात्रा मध्यप्रदेशहून महाराष्ट्रात शिरपूर, जि. धुळे येथे दाखल झाली. यात्रेचे स्वागत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी केले. याप्रसंगी सुरेश बोरसे आणि इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नंतर ही यात्रा धुळे येथे मुक्कामाला मार्गस्थ झाली. नवल ठाकरे आणि प्रा. रणजित शिंदे यांनी संयोजन केले होते.

दि. ३० मार्च रोजी सकाळी ९ वाजता यात्रा नाशिकसाठी मार्गस्थ झाली. यात्रेतील दुचाकीस्वारांचे स्वागत समितीच्या नाशिक शाखेतर्फे करण्यात आले. याप्रसंगी बोलताना यात्रेचे प्रमुख हरिंदर लाली म्हणाले की, जादूटोणाविरोधी, अंधश्रद्धाविरोधी अस्तित्वात असलेल्या इंडियन पीनल कोडमधील कायद्यांचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. यासाठी त्यांनी पंजाबी भाषेत स्वतंत्रपणे अशा कायद्याबाबत पुस्तक प्रकाशित केलेले असून, त्याचे इतर भाषांमध्ये भाषांतर होणे गरजेचे आहे. न्यायालयात घेतल्या जाणाऱ्या शपथेसंदर्भात 'कोणाचे स्मरण करून शपथ घ्यावी', याबाबतचे मार्गदर्शनही त्यांनी केले. युवा पिढीला विवाहविषयक स्वातंत्र्य देणे गरजेचे असून, विशेष विवाह कायद्यानुसार विवाहांची नोंद आवश्यक आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. राजा राम यांनी त्यांचा बालपणापासून ते चळवळीपर्यंतचा जीवनपट उलगडून सांगितला. सर्व धार्मिक पूजाअर्चा, कर्मकांड करूनदेखील अस्तिकांच्या आयुष्यातील समस्या का आहेत याचा विचार होणे आवश्यक आहे. मानवी आयुष्यातील समस्या सोडविण्यासाठी तांत्रिक-मांत्रिकाकडे जाण्यापेक्षा समुपदेशन करून घेणे गरजेचे आहे, असे विचार त्यांनी मांडले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे यांनी समितीच्या कार्यपद्धतीची आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी केले. यानंतर ही यात्रा दुपारी दोन वाजता मुंबईच्या दिशेने मार्गस्थ झाली.

संध्याकाळी कल्याण फाटा येथे यात्रेचे स्वागत भिवंडी, कल्याण शाखेचे गणेश शेलार आणि इतर कार्यकर्त्यांनी केल्यानंतर यात्रा पुढे घाटकोपरकडे मार्गस्थ झाली. तेथे समितीचे राज्य प्रधानसचिव नंदकिशोर

तळाशीलकर, राज्य सरचिटणीस विजय परब यांच्या प्रमुख उपस्थितीत यात्रेचे स्वागत करण्यात आले. बैठकीनंतर मुक्कामासाठी यात्रा पुढे मार्गस्थ झाली.

दिनांक ३१ मार्च आणि १ एप्रिल रोजी मुंबईत विविध ठिकाणी भेटी दिल्या. १ एप्रिल रोजी सायंकाळी पनवेल शाखेचे कार्यकर्ते पनवेलजवळच्या कामोठे येथे यात्रेतील कार्यकर्त्यांना भेटले. त्यांना भेटताना ही पहिलीच भेट आहे असं कुठंही जाणवलं नाही. कितीतरी ओढीनं ते आपली ओळख, माहिती देत होते. काय करतोय, कशासाठी, कसे फिरतोय हे सांगत समितीचे कार्य आणि त्यांचे कार्य सारखे कसे आहे आणि तितकेच महत्त्वाचे कसे आहे, हेही ठासून सांगत होते. त्यांच्या सोबतच्या गप्पा आजची राजकीय, सामाजिक परिस्थिती, वास्तव, धोके काय आहेत आणि आपण करत असलेले कार्य किती महत्त्वाचे आहे, याचे भान वाढवणाऱ्या होत्या. अभिमान, कौतुक आणि आदर वाढवणारी ही भेट होती.

दि. २ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता ही यात्रा पुण्यासाठी मार्गस्थ झाली. निगडी येथील भक्तीशक्ती चौकात त्यांचे उत्स्फूर्त स्वागत आकुर्डी शाखा, पुणे यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समविचारी संघटनांचे कार्यकर्ते यांनी केले. डॉ. हरिंदर लाली यांनी यात्रेचा उद्देश कथन करीत तरुणांशी संवाद साधून हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले.

त्यानंतर यात्रेचे प्रस्थान एस.एम.जोशी फाऊंडेशन, नवी पेठ, पुणे इकडे झाले. तेथे यात्रेचे स्वागत समितीचे शिवाजीनगर शाखेचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी केल्यानंतर बैठक झाली. क्रांती पोतदार हिने प्रस्तावनेत यात्रेचा हेतू व उद्देश नमूद केले. डॉ. मनिषा महाजन यांनी समितीच्या गेल्या ३३ वर्षांच्या कामाची, जादूटोणाविरोधी कायदा, सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा याबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर डॉ. हरिंदर लाली यांनी तर्कशील सोसायटी, पंजाब येथील कामाची विस्तृत माहिती दिली व फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनस (फिरा) या राष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून सर्व समविचारी संघटनांच्या कामाची माहिती झाली असे सांगितले. डॉ. राजा राम यांनी तर्क, विवेक आणि सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करून स्वतःमध्ये व समाजामध्ये बदल घडवून आणण्यासाठी ते करत असलेल्या हरियाणा आणि पंजाब येथील कामाबद्दल आणि लिहिलेल्या पुस्तकांबद्दलची माहिती त्यांनी दिली. डॉ.राजेश पेगन यांनी वयाच्या अठराव्या वर्षापासून तर्कशील सोसायटी, हरियाणा सोबत स्वतःला जोडून घेतलेले असून, चमत्काराचे प्रयोग आणि जादूचे प्रयोग लोकांमध्ये जाऊन करतात व त्यामागचे सत्य उलगडून सांगून विवेकी विचार करण्याचे आव्हान करतात, याविषयी त्यांनी गमतीशीर किस्से सांगितले. सदर बैठकीस उच्च न्यायालयाचे निवृत्त माजी न्यायाधीश बी. जी. कोळसे-पाटील, महात्मा फुले समता प्रतिष्ठानचे डॉ.मोहन वाडेकर यांनी भेट दिली. दुसऱ्या दिवशी पाहुण्यांना महात्मा फुले वाडा येथे नेले. पाहुण्यांना फुले वाड्यात जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांच्या इतिहासाची प्रचंड उत्सुकता होती. त्याचे व्हिडिओ चित्रण त्यांनी केले. पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार फुले दाम्पत्याचा वाडा बघता आला, याचा आनंद झाल्याचा अभिप्राय त्यांनी दिला. त्यानंतर यात्रा कोल्हापूरकडे प्रस्थानास निघाली.

दि.३ एप्रिल २०२३ रोजी तर्कशील सोसायटीच्या




कार्यकर्त्यांच्या भारतयात्रेचे कोल्हापुरामध्ये भव्य स्वागत करण्यात आले. थोर स्वातंत्र्यसेनानी देशभक्त डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी स्थापन केलेल्या कौन्सिल ऑफ एज्युकेशन या संस्थेच्या नाईट कॉलेजमध्ये त्यांचे अत्यंत उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच कोल्हापूरकरांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना ॲड. हरिंदर लाली यांनी यात्रेचा उद्देश व अनुभव कथन केले. संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार करणे, लोकांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे, भारत देश समजून घेणे व तर्कशुद्ध विचारसरणीसंदर्भात लोकांमध्ये जाणीव-जागृती करणे या उद्देशाने सदर यात्रा काढल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. राजा राम यांनी तर्कशील सोसायटीचा उद्देश, पंजाब, हरियाणा तसेच विदेशातील कार्य, 'तर्कशील' पत्रिकेचे स्वरूप,

**(पृष्ठ क्रमांक ३८ वर )**



# महाराष्ट्र अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत**
९८२३२८०३२७

**देहदान व अवयवदान अभियान (२३ ते ३० मार्च २०२३):**

**कुर्ला शाखा :** दि.२३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त ऑनलाईन विवेक संवादमाला घेण्यात आली. ज्यात फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅन्ड बॉडी डोनेशनचे संस्थापक पुरुषोत्तम पवार यांनी मार्गदर्शन केले.

दि.२६ मार्च २०२३ रोजी शहीद दिनानिमित्त कुर्ला शाखा व विहंग प्रतिष्ठान आयोजित रक्तदान शिबिर, अवयवदान व देहदान, पोस्टर प्रदर्शन नेहरू नगर नागरिक मंडळ, कुर्ला (पू) येथे संपन्न झाले. अवयवदान व देहदानाचे फॉर्म भरून घेण्यात आले. पल्लवी ब्लड बँक तर्फे अंनिस कुर्ला शाखा व विहंग प्रतिष्ठानला सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

**हिंगणा :** शाखेतर्फे आशा वर्कर्स यांचा मेळावा प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नीलडोह येथे संपन्न झाला. मेळाव्यामध्ये देहदान व अवयवदान अभियान राबविण्यात आले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी अंधश्रद्धेची दुनिया, चमत्काराची किमया या कार्यक्रमांतर्गत विविध सहप्रयोग प्रबोधन केले. जिल्हा प्रधानसचिव अशोक खोरगडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाची पंचसूत्री सांगितली. माजी जिल्हा प्रधानसचिव नलिनी शिरकुरे यांनी महिलांचे आरोग्य आणि अंधश्रद्धा यावर प्रकाश टाकला.

**नंदुरबार :** दिनांक २३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त शाखेच्या वतीने देहदानाची सामूहिक संकल्पपत्रके भरण्यात आली. हुतात्मा स्मारक येथे शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव आणि शिरीषकुमार मेहता व बालशहिदांना अभिवादन करून अंनिस कार्यकर्त्यांनी देहदानाचा संकल्प केला. याप्रसंगी डॉ. अर्जुन लालचंदाणी (माजी जिल्हा अध्यक्ष महा.अंनिस) यांनी देहदान व अवयवदान याबद्दल माहिती दिली.

**पिंपरी :** विजय बनसोडे, शांताराम बनसोडे यांनी नेहरूनगर, पिंपरी येथे ‘देहदान व अवयवदान संकल्प’ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी देहदान व अवयवदान यासंबंधी विशाल विमल, संजय बनसोडे यांनी माहिती दिली. यावेळी संजय बारी यांनी ‘अवयवदान, देहदान -भ्रम आणि निर्भ्रम’ या पुस्तकांचा विक्री स्टॉल लावला होता.

**निमगूळ :** २३ मार्च शहीद दिन. देहदान-अवयवदान संकल्पातून न्यू इंग्लिश स्कूल, निमगूळ, ता.धुळे येथे करण्यात आला. यावेळी मअंनिसचे जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी देहदान व अवयवदानबद्दल माहिती देऊन शाहिरांच्या स्मृतिप्रित्यर्थ देहदान व अवयवदान करण्याचा संकल्प करूया असे आव्हान केले.

धुळे व नंदुरबार वार्षिक प्रेरणा मेळाव्याचे उद्घाटन सेवीबाई वसावे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डाकीण पीडित असणाऱ्या सेवीबाई वसावे यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली होती. त्यानंतरच्या सत्रात राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी ‘अंधश्रद्धा निर्मूलनाची व्यापक वैचारिक भूमिका’ या विषयावर तर हंसराज महाले यांनी ‘जादूटोणाविरोधी कायदा’ या विषयावर मार्गदर्शन केले. मेळाव्याला धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अंनिसचे शंभरहून अधिक कार्यकर्ते उपस्थित आहेत.

**कोराडी** : येथील जवाहर नगरच्या मजूर वसाहतीमध्ये महा. अंनिसच्या विवेकी कार्यक्रमांतर्गत व्यसनांच्या दुष्परिणामावर पोस्टर प्रदर्शन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**वडवणी** : येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाअंनिसचे बीड जिल्हा अध्यक्ष प्रा. हनुमंत भोसले यांनी चमत्कारांचे विविध प्रयोग सादर करून त्या पाठीमागील वैज्ञानिक कारणे सांगून भोंदूगिरी करणाऱ्या बुवांचे केले पितळ उघडे केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून समितीचे

सांस्कृतिक विभाग राज्य कार्यवाह जायभाये सर आणि राज्य प्रशिक्षण विभाग सहकार्यवाह सुधाकर तट सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जायभाये सरांनी कार्यकर्त्यांसमोरील आव्हाने आणि कार्यकर्त्यांनी करावयाचे कार्य यावर प्रकाश टाकला तर सुधाकर तट यांनी संघटन बांधणीचे महत्व आणि पंचसूत्री सांगितली.

**जळगाव** : दिनांक २६ मार्च ते ११ एप्रिल या कालावधीत दिगंबर कट्यारे राज्य कार्यवाह यांच्यातर्फे जळगाव जिल्ह्यातील दहा तालुक्यातील बारा शाखाभेटी करण्यात आल्यात.त्या दरम्यान यावल,कुर्हा पानांचं तसेच जळगाव शहरात महानगरपालिका अंतर्गत खान्देश महोत्सव आयोजित कार्यक्रमात चमत्कार सादरीकरण करण्यात आले.

**कोल्हापूर** : ८ मार्च रोजी नाइट कॉलेजमध्ये 'जोडीदाराची विवेकीनिवड' कार्यशाळा झाली. दि.१२ मार्च २०२३ रोजी हरळी खु., ता. गडहिंग्लज येथे महिला दिनानिमित्त साथी सारिका पाटील, मुक्ता निशांत, वैष्णवी पाडले यांनी महिलांशी संवाद साधला. दि. १८ मार्च २०२३ रोजी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथे जोडीदाराची विवेकी निवड कार्यशाळा पार पडली.

दि.१३ मार्च २०२३ रोजी युवा परिवर्तन सामाजिक संघटना व महा.अंनिस शाखा हुपरी, रेंदाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिनानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलनवर प्रबोधनात्मक कार्यक्रम झाला.

दि.१४ मार्च २०२३ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा गडहिंग्लज तर्फे खणदाळ, ता. गडहिंग्लज या गावात होणाऱ्या यात्रेनिमित्त रेडा बळी देण्यात येणार ही बातमी कळताच पशुबळी विरोधात, गडहिंग्लज पोलीस उपनिरीक्षक, उपविभागीय प्रांत-अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देऊन ही बळी थांबविण्यात यावी, अशी विनंती केली. पोलीस प्रशासनाने व तहसीलदार गडहिंग्लज यांच्या पुढाकाराने खणदाळ गावातील दोन रेड्यांची बळी टळली.

१९ मार्च २०२३ - चित्रदुर्ग मठ, कोल्हापूर येथे आणि २५ मार्च २०२३ रोजी नवीन वाशी नाका, माजगावकर नगर, कोल्हापूर येथे अंनिसच्या वतीने जेंडर फेअर संपन्न झाला.

दैनंदिन जीवनात घर आणि बाहेरील अनेक कामांचे स्त्री आणि पुरुषांत लिंगभावानुसार विभागणी केली जाते. लिंगभावातून होणारा हा भेदभाव टाळण्यासाठी सर्व कामे सर्वांना आली पाहिजेत, या उद्देशाने जेंडर फेअर आयोजित केली होती.

२४ मार्च २०२३ रोजी जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर येथे जोडीदाराची विवेकी निवड संवाद शाळा पार पडली.

शनिवार, दि. २५ मार्च २०२३ रोजी कोल्हापूर या ठिकाणी लोटस फाऊंडेशन व स्पंदन संस्था यांच्या वतीने 'प्रेमात पडताना' या विषयावर संवाद शाळा घेण्यात आली. या संवाद शाळेत महाराष्ट्र अंनिस, कोल्हापूरच्या कार्याध्यक्ष रेश्मा खाडे, प्रधानसचिव हरी आवळे यांनी संवाद साधला. या संवाद शाळेत गटचर्चा, आकर्षण प्रेम या विषयावर संवाद व प्रश्न उत्तरे असा संवाद घेण्यात आला. मुलांना ही संवाद शाळा खूप आवडली.

२९ मार्च २०२३ - शाहूवाडी तालुक्यातील अमेणी येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा शाहूवाडीच्या वतीने 'असं असतंय व्हय कुठं...?' हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

नागाव : तिसरे मराठी बसव साहित्य संमेलनाच्या मंचावर महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाची- ऐसे कैसे झाले भोंदू ही बतावणी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

८ व ९ एप्रिल २०२३ रोजी 'झेप - एक भरारी आत्मसन्मानासाठी' महिलांचे शिबिर राधानगरी शाखेच्या वतीने उत्साहात संपन्न झाले. महिलांसाठी आयोजित केलेले 'झेप' शिबिर राधानगरी येथील कृष्णा फार्म हाऊस येथे प्रचंड आनंदी, उत्साही वातावरणात पार पडले.

महिलांसाठी रेपलिंग, जंगल ट्रेकिंग, रॅम्पवॉक, झुंबा डान्स, मुलाखत सत्र, जेंडर फेअर अशा वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटी घेण्यात आल्या. या शिबिराला विविध मान्यवरांनी उपस्थित राहून सगळ्यांना प्रेरणा दिली. यामध्ये अंनिस कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष डॉ. हिर्डेकर सर, लेखिका विमल मोरे, शाहीर रणजित कांबळे, ॲडव्होकेट अंजली भोसले यांनी भेटी दिल्या.

१० एप्रिल २०२३ रोजी कोल्हापूर अंनिस टीमच्या वतीने मोरेवाडी येथील ग्रामपंचायत सदस्य सौ. उज्वला मोरे यांच्या डोक्यातील जट काढून त्यांना जटामुक्त

करण्यात आले.

१० एप्रिल २०२३ रोजी महावितरण कार्यालय, शाहूवाडी येथे अंधश्रद्धेतून बोकडाचा बळी दिल्याबद्दल महा. अंनिसकडून निषेध आणि दोषींवर कारवाईसाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

**वसई (जि. औरंगाबाद)** : येथे करणी जन जागृती कार्यक्रम १ एप्रिल २०२३ रोजी घेण्यात आला. अंगात येणे हा मानसिक आजार असून इतर व्यक्तींनी आपापसात संशय घेऊन भांडणे करू नये असे आवाहन यावेळी भाऊ पठाडे यांनी केले.

**सांगली :**दि.९ एप्रिल २०२३ रोजी इस्लामपूर येथे सांगली जिल्हा प्रेरणा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यास राज्य उपाध्यक्ष प्रा शामराव पाटील अण्णा, राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे, अंनिपचे संपादक डॉ. नितीन शिंदे, कार्याध्यक्ष बी. आर. जाधव, प्रा. एल. डी. पाटील, प्राचार्य एस. बी. माने उपस्थितीत होते. यावेळी सामाजिक संस्थाचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा कार्यकारणी निवड करण्यात आली.

**गडचिरोली** : दि. २ एप्रिल २०२३ रोजी गडचिरोली शहरातील चामोर्शी मार्गावरील सेमाना मंदिर परिसरात विविध सामाजिक संघटनातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा गडचिरोली, सायकल स्नेही मंडळ, स्पंदन फाऊंडेशन व स्मृती उद्यान व्हॉलीबाल संघटना आदींचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा शाखेवर निवड झालेल्या कार्यकारणीतील नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा कार्यकारी मंडळातील सर्व विभागाच्या कार्यवाह व सहकार्यवाह सदस्यांचा दिनांक १ एप्रिल २०२३ ला परिचय व सत्कार कार्यक्रम संपन्न झाला.

●

**(पृष्ठ क्रमांक ३५ वरून )**

तर्कशील सोसायटीची वाटचाल, भारताचा सामाजिक इतिहास, अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी असणारा तर्कशील सोसायटीचा संबंध, समाजापुढील प्रश्न, वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्याची गरज अशा विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. डॉ. राजेश पेगन यांनीही अनुभव कथन केले. विद्यार्थी, प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. खूप चांगला वैचारिक संवाद झाला. कोल्हापूरला भेट देऊन खूप आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले. राजश्री शाहू महाराजांचा विचार वारसा आपण देशभर पोहोचवू, अशा भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, प्रा.डॉ. अरुण शिंदे तसेच नाइट कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

त्यानंतर 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिके'च्या संपादक मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. अरुण शिंदे यांच्या निवासस्थानी सर्वांनी मुक्काम केला. दि. ४ एप्रिल रोजी सकाळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कोल्हापूर जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. बी. एम. हिर्डेकर, कोल्हापूर शहर कार्याध्यक्ष यशवंती शिंदे, राहुल सुतार व अन्य कार्यकर्त्यांनी त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. तर्कशील सोसायटीचे कार्य जाणून घेतले. सध्याच्या राजकीय, सामाजिक परिस्थितीत अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम पुढे कसे न्यावे, यासंदर्भात विचारमंथन केले. त्यानंतर तर्कशील कार्यकर्ते गोव्याच्या दिशेने रवाना झाले.

या यात्रेच्या महाराष्ट्रातील प्रवासाचा कार्यक्रम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी आखला होता. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे, डॉ.ठकसेन गोराणे, नंदकिशोर तळाशीलकर आणि गजेंद्र सुरकार इत्यादींचे मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले.

●

## वाचकांच्या प्रतिक्रिया

अंनिसच्या पत्रिकेतील विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कामगिरीचे वर्णन करणारा आपला लेख वाचून खूप छान वाटलं लेखाची सुरुवात अलंकारिक भाषेत करून आपण लेखाची शोभा वाढवली आहे. त्यामुळे निश्चितच वाचकाच्या मनचुक्षवर महामानवाची गाथा आणखीनच खोलवर रुजण्यास अधिक मदत होईल आपण उत्तरोत्तर असंच लिहीत राहावं हीच सदिच्छा

**सागर दत्तात्रय कांबळे** इस्लामपूर(सांगली)




## अभिनंदन!

५८वा झी गौरव नाट्य गौरव पुरस्कार २०२३ (प्रायोगिक नाटक) सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पुणे जिल्ह्यातील कार्यकर्ते संगीतकार केशव दत्तात्रय कुदळे (कुदळेवाडी) यांना झी गौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल महा. अंनिसच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस सदिच्छा!

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, वक्ते प्रा.सुभाष वारे यांनी 'अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका' कार्यालयास सदिच्छा भेट दिली





## जटा निर्मुलन

अंनिसच्या कार्यकर्त्यांनी कळंबी, ता. मिरज येथील अंजली अमोल यादव (वय ४०) या महिलेचे जटा निर्मूलन केले. देवराष्ट्रे येथील मयुरी सुर्वे हिने आपल्या शिक्षिका सुजाता मोरे यांच्या सहाय्याने त्या महिलेचे प्रबोधन करून इस्लामपूर शाखेच्या मदतीने जटा निर्मुलन केले. या वेळी संजय बनसोडे, प्राचार्य डॉ. एस. बी. माने, सुरज उर्मिला, विवेक भिंगारदिवे, ओंकार कोळी नामदेव कदम आदी उपस्थित होते.

## विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीचे निमंत्रण

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक शुक्रवार, शनिवार, रविवार दि. ०२, ०३, ०४ जून २०२३ रोजी **संजीवन इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, ता. सोमवार पेठ, पन्हाळा, जि. कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीसाठी राज्य कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी, राज्य निमंत्रित, सर्व जिल्ह्याचे जिल्हा कार्याध्यक्ष व प्रधान सचिव आणि शाखांचे कार्याध्यक्ष आणि प्रधान सचिव यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**विशेष सूचना :**

• व्यवस्थेच्या दृष्टीने येत असल्याचे आणि कधी पोचणार हे संपर्क व्यक्तींना कळवावे • आपल्याकडील नाविन्यपूर्ण जो दस्तऐवज असेल तो घेवून यावा. काहीही अडचण आल्यास खालील कार्यकर्त्यांशी संपर्क करावा.

**रामदास**– ९५९४१४५२८९, **राहुल** – ७८७५१६३२१६, **निशांत** – ९३७०७७१७६०

Registered : RNI No. MAHMAR / 2022 / 83669

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष पहिले अंक आठवा, ५ मे २०२३ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–

Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 1 Issue 8, 5th May 2023 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

# महा. अंनिसचा जिल्हा प्रेरणा मेळावा



सांगली



कोल्हापूर



बीड



जळगाव



रायगड




चंद्रपूर

Printed Book Post

प्रेषक,

**अजय भालकर**
व्यवस्थापकीय संपादक

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
द्वारा : प्रा. डॉ. नितीन शिंदे
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली – ४१५४०९.
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com

प्रति, ____________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.